

कोल्हापुरची अभिजात संगीत परंपरा

• प्रकाश माळी

ज्या भूमीवर संगीताचा सूर्य कधीही मावळत नाही, अशी भूमी म्हणून कोल्हापुरचे नाव घेतले, तर ते वावगे ठरू नये. एक काळ असा होता की, या कलानगरीत अभिजात शास्त्रीय संगीताचे केशरी मळे फुलले होते. देशभरातील नामवंत शास्त्रीय संगीतरत्नांच्या दृष्टीने कोल्हापूर हे नंदनवन ठरले होते. मातब्बर शास्त्रीय संगीत विशारदांच्या दृष्टीने कोल्हापूर हे मानसरोवर ठरले होते. अर्थात हा काळ कलोपासक राजर्षि शाहू छत्रपतींचा काळ होता.

गायनमहर्षी अल्लादियाखाँ यांच्या सारख्या संगीताच्या मेरुमणीपासून केशवराव भोसले, बालगंधर्व, जगन्नाथबुवा पुरोहित, मोघुबाई कुर्डीकर, केसरबाई केरकर, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आणि हार्मोनियम वादनात एक नवा इतिहास घडविणारे गोविंदराव टेंबे यांच्यापर्यंत अनेक मातब्बर कलाकारांनी कोल्हापुराचे संगीत वैभव कळसाला नेले. कोल्हापुरची संगीत परंपरा तशी शंभर वर्षाची किंवा त्याहून जुनी आहे. आप्पय्या बुवा गवई, पांडोबा यवतेश्वर आणि इतर काही कलाकारांनी ही संगीत परंपरा आपापल्या परीने जतन केली. तथापि या परंपरेस वैभवाच्या शिखरावर नेण्याचे फार मोठे श्रेय द्यावे लागेल ते अल्लादियाखाँ आणि त्यांच्या अंत्रोली घराण्यास!

गायनमहर्षी अल्लादियाखाँ

अल्लादियाखाँसाहेबांना शाहू महाराजांनी कोल्हापुरात येण्याची विनंती केली आणि खाँ साहेबांनी क्षणार्धात ती मान्य केली. १८९६ मध्ये खाँसाहेब कोल्हापुरात आले. खाँसाहेबांच्या आगमनामागील कारण अगदी छोटेसे होते. शाहू महाराजांचे धाकटे बंधू बापूसाहेब कागलकर यांच्या पदरी तानीबाई सोनाळी-घोरपडे या नोकर होत्या. तानीबाईला खाँसाहेबांकडून शास्त्रीय गायनाचे शिक्षण मिळावे अशी तिच्या मातेची - कृष्णाबाईची इच्छा होती. कृष्णाबाईने बापूसाहेबांकडे खाँसाहेबांना कोल्हापुरात आणा असा हट्ट धरला. बापूसाहेबांनी एकदा शाहू महाराजांना मुंबईत खाँसाहेबांची अस्सल गायकी ऐकवली. शाहू महाराज अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. संगीताचा हा कोहिनूर कोल्हापुरात यावा, असे शाहू महाराजांना आसुसून वाटले. त्यांनी खाँसाहेबांपुढे शब्द टाकला. अन् खाँसा[हेब] कोल्हापुरात आले.

कोल्हापूर संगीतमय

खाँसाहेब मुळचे उनियाराचे. जयपूरचे. राजस्थानचे. ते कोल्हापु[रात] आले, तेव्हा ४१ वर्षांचे होते. तेव्हापासून अखेरच्या घटकेपर्यंत म्ह[णजे] १६ मार्च १९४६ पर्यंत खाँसाहेबानी कोल्हापुरला अभिजात संगीताच्या रागदारीच्या- ख्याल गायकीच्या सहस्त्र धारानी न्हाऊ घातले. अल्लादि[या] खाँ यांचे बंधू हैदरखाँ हेही कोल्हापुरात स्थायिक झाले. खाँसाहेबां[च्या] तिघा चिरंजीवानी- बडेजी उर्फ शमशुद्दिनखाँ- पित्याच्या पावलावर पाऊ[ल] टाकून शास्त्रीय संगीताची- गायनाची साधना केली. या घराण्यामु[ळे] कोल्हापूर कसे संगीतमय होऊन गेले! मुगलखाँ आणि रजबअलीखाँ वास्तव्यही त्यावेळी कोल्हापुरात होते.


संगीतातले गौरीशंकर

अल्लादियाखाँसाहेबांवर अक्षरशः सरस्वती फिदा होती. गळ्याचे फिरत आणि तानबाजी अविस्मरणीय होती. स्वर आणि लय यांचा संगम त्यांच्या गायकीत होता. खाँसाहेबांचे गायन कसे शुद्ध आकारयुक्त. आवाज चोरणे नाही. एकुण या घराण्याच्या गायेन परंपरेतच आवाज चोरणे हा प्रकार नाही. खाँसाहेब अनवट, मुश्किल, अपरिचित राग सफाईदारपणे आणि परिचित राग अशा काही मुश्किल पद्धतीने पेश करीत की भल्याभल्याना हा राग कोणता याचा संभ्रम पडे! रागदारीची आलापांची, बोल-तानेची ख़ाँसाहेब मुक्त कंठाने उधळण करायचे. बिलावरचे विविध प्रकार, नटचे (खेमनट, भूजनट) विविध प्रकार, कानडाचे प्रकार, मल्हाराचे अनेक प्रकार, सारंग आणि तोडीचे विविध प्रकार खाँसाहेबांच्या कंठातून सफाईदारपणे उतरायचे तेव्हा श्रुति धन्य व्हायच्या; रागदारीचे चीज व्हायचे; मैफलींचे सोने व्हायचे. बॅ. बाबासाहेब जयकरांनी खाँसाहेबांना 'संगीतातले गौरीशंकर' आणि वझेबुवांनी खाँसाहेबाना 'गवयांचा गवई' अशी उपमा दिली होती, यावरून खाँसाहेबांच्या अभिजात गायकीचा अव्वल अन् अस्सल दर्जा कळून यावा.






डावीकडून गोविंदराव टेंबे, बाळकृष्णबुवा बाबा देवल आणि मोघुबाई कुर्डीकर



उठले. अल्लादियाखाँचे पुतणे नत्थन खाँ यानीही कोल्हापुरवर आपला ठसा उमटवला.

नायकीणीने गाणे जोपासले

त्याकाळी मुली — विशेषतः घरंदाज मुली गायनाकडे-संगीताकडे फारशा आकृष्ट झाल्या नव्हत्या. नायकिणींची घराणी मात्र अग्रेसर होती. गोविंदराव टेंबे यांचे चिरंजीव भाऊसाहेब टेंबे यांच्या शब्दात सांगायचे तर नायकिणीनीच त्या काळी गाणे जोपासले. मोघुबाई-केसरबाई-लक्ष्मीबाई यांच्याप्रमाणेच लाडकुंजाँ, साहेबजाँ, सुफीजाँ, आझमबाई यांनी विलक्षण परिश्रम घेऊन, तासन्तास सराव करून शास्त्रीय गायनात आपला वेगळाच ठसा उमटवला. त्याकाळी बिदागी अगदी थोडी म्हणजे ५०-१०० रुपयांपासून २००-३०० रुपयांपर्यंत मिळायची! पण स्वस्ताई होती. शिवाय उदार राजाश्रय होता. लोकाश्रय होता. त्यामुळे शास्त्रीय संगीताचा-गायनाचा वेणू हा हा म्हणता गगनापरी गेला.

असे गायक! असे वादक!!

कोल्हापुरची शास्त्रीय गायनाची परंपरा जतन करण्यात शेकडो कलाकारांचा मोलाचा वाटा आहे! निवृत्तीबुवा सरनाईक, शंकरराव सरनाईक, वामनराव देशपांडे, नारायणराव पुराणिक (वकील), नामदेवराव भोईटे, आनंदराव लिमये, चिरवलीकर, भाईसाहेब टेंबे, सुधाकर डिग्रजकर, पोतदारबुवा, श्रुति सडोलीकर (वामनराव सडोलीकरांची कन्या), बाबुराव जाधव, पांडुरंग जाधव, विश्वनाथ बुवा जाधव किती किती नावे घ्यावीत! गोविंदराव शालिग्राम, गुलभाई जसदनवाला, त्रिभुवन जरीवाला, लीला शिरगावकर यांचे कलागुण बहरले ते कोल्हापुरातच, हे कोण विसरेल! इतकेच नव्हे, तर सुधीर फडके आणि वसंत देसाई यांनाही कोल्हापुरचा संगीतस्पर्श झाला होता हे विसरता येणार नाही.

त्याकाळी साथीची वाद्ये म्हणून हार्मोनियम, तबला, आणि सारंगीचाच वापर व्हायचा. हार्मोनियम वादनात गोविंदराव टेंबे हे वादकांचे वादक ठरले. मनोहर चरणकर चमकले. तबलावादनात बापूराव दिंडे, गणपतराव गुरव यांनी बाजी मारली. बाळूभाई सकडीकर, शंकरराव गुरव, गोविंदराव शालिग्राम यांचे बंधू बापूराव शालिग्राम, दादोबा गुरव, म्हम्मूलाल सांगावकर, बाबूराव मिराजकर, अष्टेकर, बाळासाहेब नांदणीकर, अरुण जोशी आदि मान्यवरानी तबला वादनाच्या क्षेत्रात नाव कमावले; कोल्हापुरचे नाव उंचावले. सारंगी वादनात कोल्हापुरची शान वाढविली. ती कालेखाँ हैदरबक्ष, बाबालाल सकडीकर यांनी! पखवाजवादनाने रसिकांची मने जिंकली ती सादलेबुवा आणि शालिग्रामबुवानी!

चतुरस्त्र गोविंदराव

कोल्हापुरच्या अभिजात संगीताच्या — शास्त्रीय संगीताच्या इतिहासात गोविंदराव टेंबे यांनी हार्मोनियम वादनाने एक वेगळा अध्यायच निर्माण केला. गोविंदराव हे अष्टपैलू, चतुरस्त्र कलाकार होते. केवळ हार्मोनियम वादनातच नव्हे, नाट्यसंगीतापासून चित्रपट आणि साहित्यक्षेत्रापर्यंत त्यांची भरारी उत्तुंग होती. १९११ मध्ये गोविंदरावानी 'मानापमान'ला अभिनव चाली देऊन नाट्यसंगीतात क्रांती केली. उत्तर हिंदुस्तानी पुरब जातीच ललित ढंगदार संगीत मानापमानात आणलं. 'अयोध्येचा राजा', मायामच्छिंद्र, अग्निकंकण, प्रतिभा, सैरंध्री या चित्रपटाना गोविं[…] संगीताचा साज चढविला. मृत्यू आधी महाश्वेता व जयदेव या स्वर[…] लिहिल्या. जीवन विहार, अल्लादियाखाँ यांचे चरित्र, कल्पना […] माझा संगीत व्यासंग ही पुस्तके लिहिली.

सूर की ज्योत?

गीतांचे-रागदारीचे श्रवण करून ते शब्द पेटीत (हार्मोनियम[…] अुतरविण्याची किमया साध्य केली ती गोविंदरावानी! त्यांच्या हार्मो[…] वादनातून शब्द झंकारायचे! शब्दाभास व्हायचा. सुरातून शब्द उम[…] साक्षात गीत ऐकल्यासारखे वाटायचे. गायकी अंगाने हे हार्मो[…] वाजवायचे! एक श्रुतिची पेटीच म्हणा ना. हार्मोनियम वादनात को[…] खटखट नाही, बजबज नाही; गोविंदरावांचे हार्मोनियम वादन हे म[…] होते; नितळ मुलायम होते. बाबुराव जोशी यांच्या घरी ३९-४० […] रंगलेल्या मैफलीकडे दृष्टिक्षेप टाका. गोविंदराव ठुमरी वाजवित […] (की गात होते?) आलाप, खटके, मुरके झाल्यावर मध्यम पं[…] त्यांचा हात स्थिरावला. अन् मग त्यांच्या बोटांनी काय जादू […] कोण जाणे! हार्मोनियममधून सूर बाहेर पडतात की लखलखती […] बाहेर पडतेय, हा श्रोत्यांना संभ्रम पडला.

हार्मोनियम हे केवळ साथीचे वाद्य नव्हे! शास्त्रीय गायन[…] हार्मोनियम वादनाचे स्वतंत्र कार्यक्रम करता येतात; मैफली […] येतात, हे गोविंदरावानी सिद्ध केले. थिरकवाखाँसाहेबानी जसे तबलाव[…] स्वतंत्र कार्यक्रम गाजविले; त्याचप्रमाणे गोविंदराव टेंबेनी हार्मोनियमवा[…] स्वतंत्र कार्यक्रम गाजविले. पुणे, मुंबई, मद्रास, कलकत्त्यापर्यंत […] घेतली. सोलो हार्मोनियम वादनाची परंपरा सुरू केली. गोविं[…] शिष्य गुंडोपंत वालावलकर, वासुदेवराव शिंदे (केशवराव भोसले […] जावई), बाबुराव जमदग्नी, अनंतराव जमदग्नी, बाबुराव देशपांडे […] नंतर कोल्हापुरच्या संगीत परंपरेची शान सांभाळली.

देवल क्लब — तृप्त वास्तू

कोल्हापुरच्या संगीत परंपरेत देवल क्लबचे महत्त्व अनन्य सा[…] आहे. भारतातील नामवंत कलाकारांच्या मैफलीमुळे ही वास्तू […] झाली आहे. तृप्त झाली आहे. या वास्तूची प्रत्येक भिंत […] संगीताचा कान बनला आहे. या वास्तूची प्रत्येक शिला हा […] गायनाचा ओंकार बनला आहे. साक्षात् सरस्वतीचे मंदीर म्हणून[…] वास्तूकडे पहावे लागेल. एप्रिल अखेर आणि मेच्या प्रारंभी […] समाज-देवल क्लबची शताब्दी साजरी झाली. त्या निमित्ता[…] वास्तूविषयीच्या स्मृतींना उजाळा देणे अनाठायी ठरू नये! के[…] बाबा देवल यांच्या नावाने उभारलेल्या या वास्तूच्या वैभवात […] कलाकारांचा वाटा आहे.

संगीत शारदेच्या पूजेसाठी साधनेसाठी एखादी वास्तू असा[…] मूळ कल्पना! या वास्तूच्या उभारणीपूर्वी न्यूजपेपर एजंट लुकतुके […] माडीवर मैफली रंगायच्या. १९२०-२१ मध्ये देवल क्लबच्या म[…] राजाराम कॉलेज हॉलमध्ये मा. दीनानाथ, भास्कर बुवा बखले […] कृष्णनाथ, केशवराव भोसले, अब्दुल करीम खाँ, बालगंधर्व […]

[illegible] झाली. ५५ ते ५७ दरम्यान पंडित रविशंकर यांचे [illegible] आणि अल्लारखाँचे तबलावादन असा संयुक्त कार्यक्रम [illegible] हायस्कूलमध्ये संपन्न झाला, तो देवल क्लबच्या मदतीसाठीच! [illegible] क्लबमध्ये अल्लादियाखाँपासून बरवले, रहिमत खाँ, वझेबुवा, [illegible] अमीरखाँ अशा अनेक कलाकारांच्या मैफली झाल्या. जितेंद्र [illegible] गुरू पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचे देवल क्लबमधील [illegible] अनेक उदयोन्मुख कलाकारांचा मार्गदर्शक ठरण्यास नवल नाही. [illegible] वसंत देसाआी यांची जडणघडण झाली, ती कोल्हापुरातच. [illegible] क्लबमध्ये ते तासन्तास रिवाज करीत बसायचे.

[illegible] चिरंजीव मंजीखाँ यांची ती 'समय समय के राग' ही [illegible] अविस्मरणीय ठरली. आठ वेगवेगळ्या प्रहरांचे वेगवेगळे [illegible] गायिले. आजही देवल क्लबच्या वास्तूमधून त्या अविस्मरणीय [illegible] सूर निनादतात म्हणे! अष्टौप्रहर स्वरधारांच्या अभिषेकाने न्हालेली [illegible] कोल्हापुरच्या गेल्या शंभर वर्षांच्या वैभवशाली संगीत परंपरेची [illegible] साक्षीदार बनली आहे.

[illegible] — जुन्या पिढीतील दुवा

[illegible] शतकाच्या पहाटेपासून ते दुपारपर्यंत पन्नास-पाऊणशे [illegible] कोल्हापूर हे शास्त्रीय संगीताचे गायनाचे तीर्थक्षेत्र ठरले. आज ती [illegible] राहिलेली नाही. काळाच्या ओघात आणि व्यावसायिकरणाच्या [illegible] या संगीत परंपरेस ओहोटी लागली आहे. कोल्हापुरच्या [illegible] परंपरेची संध्याकाळ झाली आहे. या गल्लाभरू जमान्यातही [illegible] लिमये यांच्यासारखा एखादा गवई जेव्हा गायन कलेला [illegible] कवटाळून राहाताना आणि आपल्या कलेचे दान तरुण [illegible] करताना दिसतो, तेव्हा सुखद आश्चर्य वाटण्याविना राहवत नाही. [illegible]साहेबांचे नातू अजिजुद्दिन खाँ जेव्हा 'जुने तेच सोने' हे सांगतात तेव्हा मनावर सुखाने तरंग उमटल्याविना राहात नाहीत. जुन्या जमान्यातील अखेरचा दुवा अभिजात गायकीचा अखेरचा दुवा म्हणून आनंदराव लिमये बुवांचे नाव घेतल्यास ते वावगे ठरू नये! लिमये बुवा आणि बाबा गवई (अजिजुद्दिनखाँ) यांच्याप्रमाणेच भाऊसाहेब टेंबे, बाबुराव देशपांडे, सुधाकर डिग्रजकर, पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचे शिष्योत्तम केशवराव धर्माधिकारी (गुणीदासांचा गुणीदास), आप्पासाहेब देशपांडे, सरनाईकबुवा हे जुन्या जमान्याचे संगीत वैभव कवटाळून आहेत. (बाबुराव जोशी हा एक महत्त्वाचा दुवा अलीकडेच निखळून पडला आहे.) आजही कोल्हापुरात संगीताच्या शास्त्रीय गायनाच्या मैफली होतात. पण त्या अपवादाने आजही कुणीतरी कुणाचा तरी गंडाबंद शागिर्द होतो. पण तो क्वचित! आजही शास्त्रीय गायनाचे, वादनाचे वर्ग चालविले जातात. पण तरुण पिढीमध्ये तासनतास रियाज करण्याची जिद्द, वर्षेनुवर्षे साधना करण्याची आच, तळमळ दिसत नाही. अुदयोन्मुख कलाकार म्हणून विनोद डिग्रजकर (गायक), सुवर्णा घोलकर (तबला वादक), भारती वैशंपायन, सुधीर पोटे, अरुण कुलकर्णी, राजप्रसाद धर्माधिकारी यांच्याकडेच आशेने पहावे लागेल.

पूर्वी गायन कलेकडे साधना आणि साध्य म्हणून पाहिले जायचे. आता पैसा मिळविण्याचे साधन अन् घटकाभराची करमणूक म्हणून पाहिले जाते. कलेच्या व्यावसायिकरणाचा परिणाम आहे हा! अन् तो स्वाभाविक आहे.

(भाऊसाहेब टेंबे, आनंदराव लिमये, अजिजुद्दिन खाँ तथा बाबा गवई आणि केशवराव धर्माधिकारी यांच्या मुलाखतीच्या आधारे तसेच गोविंदराव टेंबे व बाबुराव जोशी यानी लिहिलेल्या तीन पुस्तकातील संदर्भावर आधारीत.)

गायनाची बिदागी नको

श्रीमती मालिनी राजूरकर यांच्या गायनाचा कार्यक्रम अेका ठिकाणी आयोजित केला गेला होता. रसिकांनी अपूर्व गर्दी केली होती. [illegible] टप्पा अशा विविध गायनांनी बाअींनी मैफल रंगविली. पण [illegible] मैफलीवर स्वतः बाअीच नाराज होत्या. त्यांना गाताना मधून [illegible] खोकला येत होता. मैफल संपली. श्रोते घरोघरी गेले. चिटणीसांनी बिदागी बाअींच्या हाती दिली.

बाअींनी बिदागीचे पाकीट अत्यंत नम्रतेने चिटणीसांना परत केले. [illegible] म्हणाल्या, आज मी श्रोत्यांना खुश करू शकले नाही. मला खोकला येत होता हे मला जाणवत होते. त्यामुळे मला या कार्यक्रमाची बिदागी नको. माझा आवाज चांगला असताना मी पुन्हा येथे येअून गाअून रसिकांना आनंद देअीन व मगच बिदागी घेअीन.

फुलंब्रीकर

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर हे हजरजबाबी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या गायनाचे कार्यक्रम ठिकठिकाणी होत असत. गाणे ठरविण्यासाठी निरनिराळ्या संस्थांचे चालक येत. फार बिदागी परवडणार नाही, आमची संस्था अद्यापि बाल्यावस्थेतच आहे. मास्तर म्हणायचे, आजपर्यंत अनेक वेळा हे अैकून मी म्हातारा झालो, पण संस्था मात्र अजून बाल्यावस्थेतच आहेत.

मास्तरांचे गायन पूर्ण झाल्यावर समारोपाचे वेळी चालक म्हणत, आम्ही मास्तरांचे फार आभारी आहोत. स्नेहाचे प्रतीक म्हणून फूल ना फुलाची पाकळी आम्ही त्यांना देतो. हजरजबाबी मास्तर लागलीच म्हणायचे, अशा फुलांच्या पाकळ्या घेत घेतच मी 'फुलंब्रीकर' झालो.












वरची रांग **शोभा गुर्टू, आशा भोसले, मालिनी राजूरकर** *दुसरी रांग* **प्रभा अत्रे, [illegible]**
तिसरी रांग **प्रीती सागर, किशोरी आमोणकर, गंगूबाई हनगल**





मंगेशकर कुटुंबिय---- एक संगीतमय कुटुंब
(फोटो- लता या गौरव ग्रंथातून साभार)











वरची रांग

शहीद परवेझ, रविशंकर, इर्षाद खान


दुसरी रांग


मोईनुद्दीन डागर, विलायत खान, बुधादित्य मुखर्जी

तिसरी रांग

निशात खान, रईस खान, इमरत खान
























वरची रांग रहिमत खान, सवाई गंधर्व, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विनायकराव पटवर्धन

दुसरी रांग पं. गोविंदराव टेंबे, विष्णू नारायण भातखंडे, अल्लादिया खां, बडे गुलाम अली खान


तिसरी रांग रामकृष्णबुवा वझे, फैयाज खां, कृष्णराव फुलंब्रीकर, अब्दुल करीम खां















वरची रांग शिवकुमार शर्मा, अप्पा जळगावकर, सुलतान खान
दुसरी रांग राम नारायण, मल्लिकार्जुन मन्सूर, व्ही.जी.जोग
तिसरी रांग ब्रिजभूषण काब्रा, बिस्मिल्ला खान, हरीप्रसाद चौरसिया









[illegible]बुवा बखले



गोविंदराव टेंबे



[illegible] कृष्णराव



रामकृष्णराव वझे



करवीर निवासिनी

श्रीमहालक्ष्मी मंदिरातील संगीतसेवा

लेख व प्रकाशचित्रे — **दत्ता उमराणीकर**

आ[illegible] कोल्हापूर म्हणजे कलापूर! राजर्षि शाहूरायांची नगरी! करवीर निवासिनी श्रीमहालक्ष्मीचे शान्तीपीठ!' श्री [illegible] मंदिरात पहाटे आपण काकड आरतीसाठी गेलात तर [illegible] विविध स्वरातील अभंग आणि भूपाळ्यांचे स्वर [illegible] पडतील. परंतु सकाळी साडेआठ वाजता मंदिराच्या [illegible] असताना तंबोऱ्याचे स्वर ऐकू येतील आणि [illegible]तील चौकात प्रवेश करताच सकाळचे राग [illegible] गायकाचे दर्शन घडेल. कारण सकाळी ८-३० [illegible] ही वेळ असते देवीच्या दरबार गायकाने 'संगीत सेवा' [illegible]

आरंभ भूर्जीखाँच्या नेमणुकीनं

या संगीतसेवेची सुरुवात कलारसिक राजर्षि शाहू छत्रपतीनी १९१० साली दरबार गायक भूर्जीखाँ यांच्या नेमणुकीने केली. संस्थानी कारकीर्दीत जुन्या राजवाड्यातील श्री भवानी मंदिरातील 'दरबार हॉल'मध्ये दसरा, दिवाळीच्या सणात खाँसाहेब अल्लादियाखाँ यांच्या संगीत मैफली होत असत. खाँसाहेबांना तीन सुपुत्र. थोरले नसिरूद्दीन (बडेजी), मधले बद्रुद्दीन (मंजिखाँ), व धाकटे शम्सुद्दीन (भूर्जीखाँ). ही तीन्ही मुले महाराजांचे वाड्यावर असावयाची. पुढे खाँसाहेबानी बडेजी आणि मंजिखाँ यांना बोलावून गाण्याच्या तालमी देण्यास सुरुवात केली. भूर्जीखाँ मात्र महाराजांच्या मर्जीमुळे वाड्यावरच संस्कृत व इंग्रजी शिकू लागले.

अल्लादियाखाँ यांची मैफल...डावीकडे भुर्जी खाँ (खाँ साहेबांचे चिरंजीव) आणि उजवीकडे अजिजुद्दिन खाँ (खाँसाहेबांचे नातू).

अधूनमधून वडिलांचेकडे यावयाचे तेव्हा गाणे शिकू लागले. परंतु रियाज करण्यासाठी वेळ मिळावयाचा नाही.

दरबारगायक अल्लादियाखाँसाहेबांचे गाण्यावर राजर्षि शाहू महाराज नितांत प्रेम करीत. महाराजांनी त्यांना कांही देऊ केलं तर ते कांही घ्यावयाचे नाहीत. इकडे बडेजी आणि मंजिखाँ यांचा रियाज उत्तम सुरू होता. धाकट्या शम्सुद्दीनला म्हणजे भूर्जीखाँ याना रियाज करता यावा म्हणून छत्रपतीनी त्यांची श्रीमहालक्ष्मी मंदिरात देवीची संगीत सेवा करण्यासाठी 'दरबार गायक' म्हणून १९१० साली नेमणूक केली. पाणीदार डोळ्यांचे, भुऱ्या केसाचे आणि गोरेपान असणाऱ्या भूर्जीखाँची दरबार गायक म्हणून मासिक ३५ रु. पगारावर जेव्हा नेमणूक झाली तेव्हां त्याचे वय १७ वर्षाचे होते. श्रीमहालक्ष्मी मंदिरातील संगीतसेवेची ही सुरुवात.

भूर्जीखाँचे गायनाला श्री. गणपतराव गुरवांची तबल्याची साथसंगत असे. खाँसाहेबाची दररोजची ही संगीत सेवा श्रवण करण्यासाठी त्या काळात अनेक होतकरू गायक श्रीमहालक्ष्मी मंदिरात हजेरी लावत असत. नवरात्रातील नऊ दिवस मंदिरातील श्रीगरूड मंडपांत गायन, वादन, नृत्य इत्यादी कार्यक्रमासाठी परगावचे कलावंत येत असत. त्यांची सारी व्यवस्था करण्याचे काम अर्थातच भूर्जीखाँसाहेब चोखपणे बजावित असत. जेव्हां खाँसाहेब परगावी जात अथवा आजारी असत त्यावेळी संगीतसेवेचा काम खाँसाहेबांचे शिष्य गण श्री. मल्लिकार्जून मन्सूर, श्री. गजानन बुवा जोशी, श्री. नाना सडोलीकर, श्री. मधुकर कानेटकर करीत असत.

पालखी समोरील संगीत सेवा

नवरात्रातील नऊ दिवस देवीची पालखी निघते. देवीच्या [illegible] समोरील 'संगीत सेवेची प्रथा संस्थानी कारकीर्दीत सुरू होती [illegible] पेटी, सारंगी, वाजविणाऱ्या साथीदारांनी ही वाद्ये कमरेला [illegible] व गायिकेने या साथसंगतीत देवीचे पालखीपुढे नृत्य व गायन [illegible] अशी ही प्रथा. 'खाँसाहेब अल्लादियाखाँ साहेबांच्या शिष्या [illegible] व सुफीजान याही पालखीपुढील संगीतसेवा करीत असत.

नामवंतांची सेवा

जेव्हा बाहेरगावची नामवंत गायक मंडळी श्रीमहालक्ष्मीचे [illegible] येत, त्यावेळी आपली 'संगीत सेवा' देवीपुढे रूजू करीत [illegible] मंदिरातील मधल्या गाभाऱ्यात अशी सेवा ज्यानी आजपर्यंत [illegible] त्यामध्ये ख्यातनाम गायिका श्रीमती हिराबाई बडोदेकर, पं. [illegible] (पं. जसराज यांचे वडीलबंधू), पं. व्ही.ए. कागलकरबुवा यांची [illegible] घेतली जातात.

भूर्जीखाँनंतर नानाबुवा जोशी

खाँसाहेब भूर्जीखाँ यांच्या निधनानंतर श्रीमहालक्ष्मी चे दरबार [illegible] म्हणून श्री. नानाबुवा जोशी कुरुंदवाडकर यांची नियुक्ती करण्यात [illegible] श्रीक्षेत्र नृसिंहवाडीजवळ असणारे कुरुंदवाड हे छोटेसे गांव. त्या [illegible] नानाबुवांनी वयाच्या आठव्या वर्षापासून संगीतसाधनेला सुरुवात [illegible]

सध्याचे संगीतसेवक श्री. गणेश बनछोडे सेवा बजावत असताना. साथीला श्री. भास्करराव पोवार (तबला) व श्री. घाटगे (हार्मोनियम)

दुसरे दरबार गायक कै. नानाबुवा जोशी कुरुंदवाडकर.

(१९०८ साल) नानाबुवांचे वडीलसुद्धा नामवंत गायक होते. ख्यातनाम गायक रहिमत खाँचे वडील हद्दूखाँचे त्यांचे गुरू होते. वडिलांचे कडून मिळालेला गोड गळ्याचा वारसा आणि पुढे रहिमतखाँचे मार्गदर्शन यामुळे नानाबुवाही मोठ्या तयारीने गात असत. गायनाच्या विकासाच्या दृष्टीने १९२१ सालपर्यंत त्यांनी कर्नाटकात खूप ठिकाणी भ्रमंती केली. नंतर कुरुंदवाड गावी परतले. शाळांतील विद्यार्थ्यांना संगीत शिक्षणाचे धडे देत असताना त्यांनी पुण्यात संगीताचा वर्ग सुरू केला. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी पुणे सोडून चिकोडीत स्थायिक होण्याचा प्रयत्न केला तेही जमले नाही.

नानाबुवांचा नामवंतांनाही आदर

पं. नारायणराव व्यास, विष्णुपंत छत्रे, सुधीर फडके, लता मंगेशकर, अब्दुल करीमखाँ इत्यादी ख्यातनाम गायकांच्या मनात नानाबुवा कुरुंदवाडकर यांच्याबद्दल आदर होता. नानाबुवा सुरुवातीपासूनच प्रसिद्धीपासून दूर होते. कोल्हापूरातील ताराबाई रोडवरील 'श्रीगणेश संगीत विद्यालय' सुरू करून नानाबुवानी अनेक शिष्य तयार केले. आपल्या मनमिळावू आणि प्रेमळ स्वभावाने नानाबुवा जोशींनी अल्पावधीतच करवीरच्या जनतेची मने जिंकली. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी आपल्या संगीत सेवेत कधीही खंड पडू दिला नाही.

२९ जून १९८५ ! आषाढी एकादशीच्या दिवशी नित्याप्रमाणे श्रीमहालक्ष्मी दरबारातील त्यांची संगीत सेवा झाली आणि सायंकाळी हृदयविकाराने त्यांचे दुःखद निधन झाले. ३५ वर्षाची अखंड संगीत सेवा श्रीमहालक्ष्मी चरणी रूजू झाली. नादब्रह्म अनंतात विलीन झाले.

नानाबुवांनंतर श्री. बनछोडे

कै. नानाबुवा जोशी यांच्या निधनानंतर या संगीत गणेश बाळकृष्ण बनछोडे या तरुण गायकाची (वय करण्यात आली. श्री. बनछोडे हे स्वर्गवासी चित्तरंजन जनवाडकर, श्री. वसंत खाडिलकर, श्री. दोडवाडकर या साऱ्या शिष्यवर्गामध्ये श्री. बनछोडे हे शिष्य. उतारवयात असणाऱ्या गुरुजींची त्यांनी खूप गुरुभक्ती संपादन केली. विविध गायन स्पर्धेत अनेक करणारे श्री. बनछोडे हे व्यापारी आहेत. परंतु प्रातःकाली मंदिरात देवीसमोर संगीत सेवा करताना तल्लीन होऊन १०० रु. मिळणारे वेतन जगदंबेचा प्रसाद मानतात. संगीत सेवेची त्यांना अनेक वेळा उत्तम प्रचिती आली बनछोडे मोठ्या भक्तीभावाने नमूद करतात. कीर्तनकार श्री. शिरोलीकर बुवा या संगीतसेवेत तर श्री. भास्करराव पोदार तबल्याची साथ करतात.

सकाळच्या मंगलमय वातावरणात श्रीमहालक्ष्मीच्या करताना मनाला आल्हाद देणारे संगीतसूर कानावर निवासिनीच्या दर्शनासाठी आलेला भाविक कांही काळ सुंदर सुरावटीने आकर्षित होतो. मंदिरात विसावतो. आणि नित्य नैमित्तीक कर्मासाठी मंदिरातून बाहेर पडतो. मंदिरातील ऐकत असताना आठवण होते ती पैगंबरवासी खाँसाहेब आणि स्वर्गवासी नानाबुवा जोशींची.

श्रीमहालक्ष्मी मंदिर व गरुड मंडप

श्रीमहालक्ष्मी मंदिरातील पहिले दरबारी गायक खाँसाहेब भूर्जीखाँ

एक दुर्मिळ योग ...



पुण्यातील बालगंधर्व नाट्यमंदिराच्या उद्‌घाटनप्रसंगी श्री. वसंतराव देशपांडे, श्री. भीमसेन जोशी व श्री. सुधीर फडके हे तिघे एकत्र - एक अभंग गाताना.... हार्मोनियमच्या साथीला श्री. पु. ल. देशपांडे.

शास्त्रीय संगीत प्रसार: [illegible]निमुद्रिकांनी बजावलेली कामगिरी

● ध्वनिमुद्रिकांचे संग्राहक श्री. म.त्र्यं. शेरीकर यांच्याशी बातचीत ●

● अरुण म्हात्रे

[illegible] मी गेलों. दुपार झाली होती. [illegible] होते. मी हाक मारली. पण आत कोणी नव्हते. [illegible] ळत ठेवायला, घरातल्या असंख्य वस्तू तिथे [illegible]

[illegible], सर्वत्र पुस्तकांच्या चवडी, आणि [illegible], हारीने मांडलेल्या, आत-बाहेर, सेल्फवर सर्वत्र [illegible]मुद्रिका. असंख्य!

[illegible] अनुभवी नजर असलेल्या. संयत, शांत. [illegible]च्या प्रत्येक दिवसाच्या नवीनतेने त्यांच्यातील [illegible] साधा ओरखडाही उठणार नव्हता.

[illegible] किती? ३५०० भारतीय तर १२०० पाश्चात्य! [illegible]मुद्रिका तितकीच पुस्तके. इंग्रजी, मराठी, संस्कृत. [illegible] हेच! संगीत, तत्त्वज्ञान, नाटक, काव्य वगैरे... [illegible]च. पेन्शनीतल्या म्हाताऱ्यासारखी! बुजुर्ग!!

[illegible]ऱ्यात असलेले एक गृहस्थ हातात पुस्तकांचे सेल्फ [illegible] कुठूनतरी येताना दिसले. मी ओळखले. हेच ते [illegible] हातात पुस्तके घेऊन ते जिना चढून वर आले [illegible] धाप लागली होती. 'मुंबई तरुण भारत'कडून [illegible]ऱ्यावर त्यांनी, अगोदर त्यांना आलेल्या पत्राचा संदर्भ [illegible] त्यांची वाक्‌यात्रा सुरू झाली.

[illegible]प्रिय विषयांवर बोलायला सुरुवात करताच जणू त्यांचे [illegible] ते विसरले. स्वतःच भराभर बोलू लागले. विनायकराव [illegible]लगंधर्व, सवाई गंधर्व, मोगुबाई कुर्डीकर, केसरबाई, [illegible]बाई, जोहरबाई... नावामागून नावे... आणि मी पाहता [illegible]च्या चक्रावर बसून थेट ६० वर्षे जुन्या सुरांच्या नादविश्वात, [illegible]तच्या डोहात विहार करू लागलो.

● [illegible]मुद्रिका जमविण्याची सुरुवात केव्हापासून केलीत? का?

[illegible] जन्म १९२७ चा. तो काळ शास्त्रीय संगीताचा भारदस्त [illegible] मी वयाच्या २० वर्षापासून म्हणजे ४६-४७ सालापासून [illegible] लागलो. त्या अगोदर गायकांबद्दल, त्यांच्या गायकीबद्दल [illegible] होते. १९४० च्या आधीच्या सर्व श्रेष्ठ गायकांची शब्दचित्रे [illegible] ध्वनिमुद्रिकांच्या माध्यमातून त्यांची गायकी समजेल ह्या [illegible]र्डस्‌ची खरेदी केली. 'रत्नाकर'मध्ये गोविंदराव टेंबे यांनी [illegible]रजान' असा लेख लिहिलेला मला आठवतोय. बाई [illegible] निधनानंतर बाबुराव पटेल यांनीही 'फिल्म इंडिया' मध्ये [illegible] लिहिला होता. 'शास्त्रीय संगीत गायकांचा इतिहास' असेही



एक पुस्तक आहे. ह्या वाचनाचा परिणाम म्हणजे, त्यावेळी वाचलेली ह्या सर्वांची शब्दचित्रे त्यांच्या गायनातून समजावून घ्यावी अशी उत्कंठा लागली. आपल्याकडचे कलाविषयक समीक्षा लिहिणारे, केशवराव भोळे, वसंत शांताराम देसाई, ना. सी. फडके, गोविंदराव टेंबे ह्यांच्या लिखाणातून तसेच स्वतः कलाकार असलेल्या मुल्कराज आनंद, व्यंकटाचलम् (त्यावेळचे ललित कला अकादमीचे चेअरमन) यांच्या भाषणाचा, लिखाणाचा परिणाम झाला.

● कधीपासूनच्या ध्वनिमुद्रिका आहेत? कोणाकोणाच्या?

— १९०३ सालापासूनच्या रेकॉर्डस् माझ्याकडे आहेत. १९३५ पर्यंत त्या मॅन्युअली ऑपरेट' करावयाच्या पद्धतीच्या होत्या. १९३५ नंतर त्या इलेक्ट्रिकली ऑपरेटेड पद्धतीच्या येऊ लागल्या. जवळजवळ सर्व कंपन्यांच्या रेकॉर्डस् माझ्याकडे आहेत. एच.एम.व्ही., ओडियन, जयभारत, यंग इंडिया, लोटस, रिगल, मेगाफोन, हिंदुस्थान ही आता आठवत असलेली काही नावे. आणखीही नावे आहेत.

गोहरजान (त्यावेळची नंबर एक गायिका), मलिकाजान, जानकीबाई, जोहराबाई, मोजुद्दीन खान, अशफ अली, उमेद अली (पं. भातखंड्याचे गुरू), अनामत अली, गिरीजाबाई केएकर, माधवराव तारावाबादकर, चिदानंद नगरकर, डॉ. रातंजनकर, मोगुबाई कुर्डीकर, केसरबाई केरकर, गोहरजानच्या तोडीने गाईल इतक्या तयारीच्या बाई सुंदराबाई ह्या सर्वांच्या रेकॉर्डस् आहेत.

● ध्रुपद-धमार हा प्रकार रेकॉर्ड्सवर आहे?

— माझ्या माहितीप्रमाणे नाही. हा खूप जूना काळ. त्यावेळच्या गायकांना आपण गातो ते रेकॉर्ड होईल याची खात्री नसावी.

● आणि ख्यालगायकी?

— ती आहे. नारायणराव व्यास हे महत्त्वाचं नांव. त्यांच्या रागदारीच्या ६० ध्वनिमुद्रिका माझ्याकडे आहेत. मला वाटतं इतकं शास्त्रीय संगीत ध्वनिमुद्रित झालेले ते एकमेव असावेत. मा. मनहर बर्वे, भीष्मदेव चट्टोपाध्याय, ओंकारनाथ ठाकूर ही त्यातली आणखी काही मातब्बर माणसं. मल्लिकार्जून मन्सूर, बसवराज राजगुरू हे ही थोर होते.

मेहबूब जान (सोलापूर), ताराजान (गदग), अक्कुजान (बेळगाव) [मुसलमान बायका नावापुढे जान लावीत. ती एक पद्धत होती.] तसेच जद्दनबाई, रोशनकारा बेगम ह्यांचंही गाणं आहे.

● ध्वनिमुद्रिकांच्या बाबतीत एखाद्या घराण्याने सतत ह्या प्रकारावर प्रभुत्व ठेवलंय किंवा ती घराणी जास्त पॉप्युलर राहिलीत असं जाणवलं?

— जयपूर, ग्वाल्हेर घराण्याच्या सर्वात जास्त ध्वनिमुद्रिका आहेत. त्या खालोखाल किराणा घराणे. आग्रा घराण्याच्या कमी. पण चांगलं गाणं माझ्या आवडीचे गायक निसार हुसेन, फैय्याज खाँ, विलायत हुसेन हे आग्रा घराण्यातले.

● ध्वनिमुद्रिकांचे विभाग पडलेले दिसताहेत!

— हो. शास्त्रीय संगीत, गझल, ठुमरी, दादरा, नाट्यसंगीत, भावगीते असे विभाग आहेत. पण माझ्याकडे गायक व्यक्ती गृहीत धरून रेकॉर्ड एकत्र केल्यात. ते बरे पडते. गोहरजान आणि कलीजान (दिल्ली) यांच्या टप्प्याच्या रेकॉर्ड आहेत.

● शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत यांच्यातील कालखंडाविषयी काही सांगू शकाल?

— प्रथम शास्त्रीय संगीत होतं. मग सुगम संगीत आलं ते नाट्यसंगीतांच्या माध्यमातून. प्यारासाहेब, मोजुद्दीन (कलाकत्ता), गजाननराव जोशी (कंठसंगीत), के. वाय. काळे हे शास्त्रीय संगीतकार आणि मा. कृष्णराव, केशवराव भोळे, सुधीर फडके ही सुगम संगीतातील मातब्बर माणसं. मा. कृष्णराव यांनी नाट्यसंगीतच दिलंय. 'प्रभात'चे चित्रपट आणि रांगणेकरांच्या 'नाट्यनिकेतन'ची नाटकं ह्यांच्यातील संगीत मा. कृष्णराव यांचं. ज्योत्स्ना भोळे यांनी कुलवधूमधील गाणी मा. कृष्णराव व केशवराव भोळे ह्या दोघांनी स्वरबद्ध केलीत. जी. एन. जोशी, जे. एल. रानडे, हुरवाळीकर, बबन नावडीकर, एस. डब्ल्यू. ढगे, सुमन माटे, शांता मणेरीकर, मालती पांडे, कुमुदिनी पेडणेकर, मोहनतारा अजिंक्य, कुसुम मोहिनी ही भावगीत गाणारी मंडळी. गजानन वाटवे हे तर सर्वांना ठाऊक आहेतच. पु. ल. देशपांडे यांनी सुद्धा अनिलांच्या कवितांचं गायन केलं आहे. प्रभाकर गुप्ते, ना. घ. देशपांडे, माधवराव पटवर्धन, राजा बढे, स. अ. शुल्क (जरा जपून हळू चाल ग, रमला कुठे ग कान्हा) ही त्यावेळची गीतकार मंडळी. मग गदिमा आले.

● काही कविंच्या रचनाही स्वरबद्ध झाल्यात?

— हो तर. १९४० ते ५० हा तो काळ असावा. ... तांबे, माधव ज्युलियन ह्यांच्या कविता भावगीते म्हणून ... तांब्यांची एक कविता आझमबाईंनी गायलीय. ... लक्ष्मीबाई जाधवानी गायल्यात. लक्ष्मीबाई ही 'बाई-सुंदराबाईं ...

खूप गेयता. गीतातला भाव स्वरात आणण्याचे ... भावगीतांची वैशिष्ठ्ये सांगता येतील. बाई सुंदराबाईंनी ... गीत गायलेय. अंतरा गाताना एका ठिकाणी त्यांचा ... आलेला तुम्ही पाहा. (त्यांनी ते गीत व ती जागा ... वर्णन करताना त्यांनाही भरून आले.). नव्या गायकांनी ... शिकायला हवं!

● पूर्वीच्या गाण्यांची आणखी काही वैशिष्ठ्य सांगता ...

— आता अभंगाची गोष्ट घ्या. 'विठ्ठल रखुमाई ... बालगंधर्वांनी गायलेले अभंग. किंवा 'अमृतसिद्धी' नाटकात ... बालगंधर्व गात (त्या पदांना संगीत मा. कृष्णराव यांनी ... ऐकत असताना त्यातलं स्वरमाधुर्य, गीतांचा आशय हा इतका ... होत असे, त्याचं कारण समरसता! जरी रागदारीमध्ये हे ... तरी म्हणताना बालगंधर्व ते म्हणण्याच्या सोयीप्रमाणे ... अभंगांना शास्त्रीय संगीताची गरज नाही असंच मला ... सुंदराबाई ही काहीही न शिकलेली बाई ज्या तयारीने गायची ... तर साऱ्यांनी हे शिकायला हवे.

● सुंदराबाईंचं नाव तुमच्या बोलण्यात खूप येतं!

— बाई होती तशीच. मराठा घराण्यातल्या ह्या बाईने ... सेवा केलीय. दुर्दैवाचे दशावतार व्यक्तिगतं आयुष्यात ... आले. पण गाण्यात, न शिकता ह्या बाईने जी जागा ... तोड नाही. शास्त्रीय संगीत, गझल, ठुमरी, दादरा, लावणी, ... भावगीते, नाट्यगीते, सारे गायनप्रकार ती गायली. ... थोरल्या बहिणीप्रमाणे मानायचे. 'सत्य वदे वचनाला ... प्याला'तील पदाला चाल देणे कुणाला जमले नाही ते ... 'कत्ल मुझे कर डाला' ह्या गझलेच्या चालीवर त्यांनी हे ... आणि बालगंधर्वांनी त्यांना हात जोडले. भारतातील त्या ... नंबरची गायिका गोहर हिचे त्या काळी गाजलेले गाणे — ... तितक्याच तयारीने पेश केल्यावर 'गोहरबाई'ने सुंदराबाईंना ... भेट दिला होता. त्या काळी त्याची किंमत काही हजार ...

● रेकॉर्डस् मिळविताना काही प्रयास पडले?

— पगारातील पैसे साठवून वर्षाला एकदम ५०० रु.ची ... असे. त्यावेळी दुकानाचे मालक पारशी किंवा मुसलमान ... त्यांना सांगितलेले गाणे कोणते हे कळत नसे. मग रामकृष्ण ... बालगंधर्व, अल्लादिया खाँ, हैदरखान, निसार हुसेन अशी ... नावे सांगायचो आणि ते 'ये चलेगा क्या' म्हणत त्या गायकांच्या ... पुढे करायचे. मीही तपशीलात न शिरता घ्यायचो. ...

[illegible] महमद अली, अशक अली यांच्या रेकॉर्डस् [illegible] फिरोज दस्तुर, कुमार गंधर्वांनी वयाच्या [illegible] ह्याही तशा कष्टाने मिळविलेल्या रेकॉर्डर्स!

[illegible] कांमधला फरक सांगू शकाल?

[illegible] ऑर्डरमध्ये गातात असं वाटतं. कुठे अपीलच [illegible] तन्मयता एवढी की, गाणं ऐकताना एका वेगळ्या [illegible] 'डोळे हे भोळे तुझे जीव झुरे साहू कसा' [illegible] गीत सुंदराबाईंच्या आवाजात ऐका. तुम्हाला मी [illegible] हा मनस्वीपणा आता कुठे आहे? अलीकडच्या [illegible] अत्रे, पं. जसराज, पं. भीमसेन आवडतात. जितेंद्र [illegible] मंगेशकर हे जरा वेगळ्या पद्धतीने संगीत देऊन [illegible] करतात. पण त्यांच्यातही मी फार रमत नाही.

[illegible] झालेला महत्त्वाचा फायदा?

[illegible] च्या संदर्भात म्हणाल तर भातखंडे यांनी संगीताला [illegible] दिलं. पलुस्करांनी त्याचा भारतभर प्रसार केला. आणि [illegible] ध्वनिमुद्रिकांद्वारे हे गाणं तळागाळापर्यंत पोहचवलं. [illegible] मुळे त्यांचं रेकॉर्डिंग कमी झालंय. पण त्यांचा [illegible] आहे. पं. भास्करबुवा बखले यांच्या नुसत्या आठवणी [illegible] नाहीत. तो खूप जुना काळ. प्रत्येकांनी संगीतात केलेली [illegible]

[illegible] जपून ठेवण्यासाठी काय करता?

[illegible] प्राणापलीकडे जपतो. तो माझा अनमोल ठेवा आहे. [illegible] रेकॉर्ड माझ्यांकडून फुटली नाही. बॉक्सेस केले आहेत. [illegible] पुसतो, स्वच्छ ठेवतो. एकूण हे खूप खर्चिक काम आहे. [illegible] अविवाहित राहून माझ्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग ह्याच्यावर [illegible]

[illegible] काही करण्याविषयी योजना?


[illegible] एक अभ्यासिका असावी, ज्यांना यात गति आहे, रस [illegible] त्याचा लाभ घेता यावा. नव्या पिढीला याचा परिचय व्हावा, त्यातून काही प्रेरणा मिळाली तर मिळावी असा प्रयत्न करण्याचे माझ्या मनात आहे. खूप पुस्तके आहेत. विविधांगी साठा आहे. त्याचा सर्वांना फायदा मिळावा असं मनापासून वाटतं. ऑगस्ट ८७ मध्ये मी रिटायर होतोय. काही पैसे मिळतील. त्यातून काही करता आलं तर पाहावं. मी अजून घरी येतो आणि खूप दमल्यावर आवर्जून माझ्या खास आवडीच्या रेकॉर्डस काढतो. हिराबाई बडोदेकर, बाई सुंदराबाई, लक्ष्मीबाई केएकर, अंजनीबाई कनगुटकर, नारायणराव व्यास, बालगंधर्व, फैय्याजखान, रामकृष्णबुवा वझे, पलुस्कर (भजन), मा. दीनानाथ ह्यांच्या रेकॉर्डस हा माझा विरंगुळा आहे. ज्यांचे सूर चिरकाल माणसाच्या मनात तरंगत राहतील असे हे गायक आहेत. हे गाणं सर्वांपर्यंत जावं हीच माझी प्रेरणा आहे...

— मुलाखत संपल्यावर शेरीकर मला सोडायला स्टेशनपर्यंत आले. स्वतःच्या पैशाने, नको म्हणताना चहा पाजला, नानकटाई दिली. एखाद्या पौगंडावस्थेतील मुलाच्या उत्साहाने ट्रॅक क्रॉस करीत मला काळोखातून प्लॅटफॉर्मवर नेले. आणि तोंडाने बालगंधर्वांच्या आठवणी, नेहरू, रसेल यांचे लिखाण, सावरकरांचा सहवास, गिरगाव, प्रार्थना समाज येथे होणाऱ्या बैठकी याविषयी बोलत राहिले.


बोलताना त्यांच्या घशाची शीर तटातट फुगून येई. धाप लागल्यामुळे प्रत्येक शब्द त्यांना वाकून बोलावा लागे. तरी ते अपरिहार्य असल्यासारखे बोलत. मग जणू १९३५-४५ ह्या काळाच्या परिघावरच आपण उभे आहोत असे वाटू लागे.

ट्रेन येई. ट्रेन जाई. सिग्नल तांबडा होई. मग पिवळा, मग निळा, काळ तसाच रेंगाळत राही. जणू तबकडीच्या एका टोकावर शेरीकर उभे आहेत. दुसऱ्यावर त्यांची असंख्य श्रद्धास्थाने. आणि एकमेकाभोवती ती अखंड फिरत आहेत. येणारे नवे वर्ष, बदलणाऱ्या सिग्नलसारखे शेरीकर आणि त्यांच्या असंख्य देवदेवतांनी लीलया पचवले आहेत.

....ते परत घरी निघाले तेव्हा वाटले की शेरीकरांच्या मनात रुतून राहिलेल्या त्या संगीताच्या सुवर्णयुगासमोर काळ हतबल होऊन पडला आहे....









पाच हजार आठवणी

कुठल्याशा संध्याकाळी मी प्रभाकर दातार यांच्याकडे गेलो. ऑफिसातून ते नुकते आले होते.

१९३०-४० सालात शोभावी अशी मराठी इमारत, लांबलचक गॅलरी आणि गाडीला डबे असावे तसे एकेक घर. टीपीकल मध्यमवर्गीय. मुलाखतीसाठी आलो म्हटल्यावर स्वागत झाले. अंक निघायची वेळ इतकी जवळ आली होती की 'एवढ्या झटकन मुलाखत देणे, कठीण आहे'. दातारांनी सांगून टाकले आणि मुलाखत घेतली तर काय काय यायला हवे ते सांगण्यासाठी त्यानी बोलायला जी सुरुवात केली.... वाटले. सहज कोपऱ्यात पडलेल्या ऑर्गनवरची धूळ झटकायला घ्यावी आणि सहज सूर लावावे आणि बघता बघता त्या सूरातली सगळी गाणी वाजवीत राहावी..... मीही मग जे जे मिळेल ते साठवित राहिलो. दुसऱ्या दिवशी मुद्दामहून त्यांच्या ऑफिसमध्ये — रिझर्व्ह बँकेत गेलो आणि 'प्रभाकर दातार' ह्या लोकविलक्षण संगीत प्रेमी माणसाच्या पद्धतीने त्याच्या संगीत साठ्याचा शोध घेत गेलो.

श्री. दातार यांना नाटकाचे विलक्षण वेड. त्यांचे वडिल हौशी नट होते. त्यामुळे नाट्यकलावंतांची घरी उठबस असायची. नाटके पाहाण्याचा फ्री पास दातारांना त्यामुळे मिळालेला. दातारांनी नाट्यसंगीताच्या खूप ध्वनीमुद्रिका जमविल्या आणि मग प्रत्येक नाट्यसंगीताच्या मागे जाऊन त्याच्या मूळ चीजेचा शोध घेतला. त्यामुळे रंगमंचावरील गाजलेले किंवा विस्मरणात गेलेले असे नाट्यसंगीत त्यांना गवसलेच. त्यासाठी मूळातच निर्माण झालेले, बैठकीतले, मैफलीमधले शास्त्रीय गाणेही त्यांना मिळाले. अर्थात दातारांनी नाट्यसंगीतापुरतेच स्वतःला बंदिस्त करून घेतले नाही, ज्याला मराठी चित्रपटसंगीताचा सुवर्णकाळ म्हणता येईल त्या काळापासून, १९५०-५४ ह्या सालापर्यंतच्या मराठी चित्रपटांच्या ध्वनिमुद्रिका त्यांच्याकडे आहेत.

म्हणजे थोडक्यात, बालगंधर्व, मा. दिनानाथ, हिराबाई बडोदेकर, गंगाधरपंत लोंढे, पंढरपुरकर बुवा, मा. कृष्णराव यासारखे नाट्यसंगीताचे प्रणेते त्यांच्याकडे आहेत, तसेच ज्यांनी त्याचे सूर सजविले ते गोहरजान, मल्काजान, बाई सुंदराबाई; प्यारासाहेब, मज्जुद्दीन खान, हेही आहेत. जसे नाट्यसंगीत आहे तसे, गोविंदराव टेंबे, मा. कृष्णराव, आण्णासाहेब माईणकर, सुरेशबाबू माने, सी. बालाजी, दादासाहेब चांदेकर, ते वसंत देसाई, सुधीर फडके यानी संगीतबद्ध केलेली गाणी आहेत. ज्या अनेक

वर्तुळातून संगीत ह्या ना त्या पद्धतीने पाझरत ... श्री. दातार यांनी हस्तगत केलीत. संगीताचे अ... मनामध्ये जपून ठेवणारा हा माणूस संगीताच्या ... आदर्श.

श्री. दातारांच्या अनेकानी मुलाखती घेतल्यात. ... १९०६ पासूनच्या ध्वनिमुद्रिका आहेत म्हणून कौ... वेगवेगळ्या प्रकारच्या रेकॉर्डस् म्हणून अचंबा व्यक्त ... त्यांच्याकडच्या पाच हजाराहून अधिक असलेल्या ... केलीय.

अगोदरच्या मुलाखतीतून आलेले प्रश्न टाळूनच मी ...

• शास्त्रीय संगीत समजते? म्हणजे त्यांचे जे सूरांचे ...

नाही. म्हणजे एखाद्या रागाचे आरोह-अवरोह ... सिक्वेन्स, वादी-संवादीचे सूर असे ज्ञान नाही. ... येतो. हा बागेश्री, हा यमन, हा रामकली, हा ... नाट्यसंगीताच्या मदतीने बालगंधर्वांचे 'टकमक ... मधलं आहे. त्यावरून 'यमन' चं चलन कळतं. ... सदृश राग ओळखता येतो. ही पदे आणि त्याच्या मू... ऐकल्यात की, त्यावरून कान तयार झालेत.

• रेकॉर्डस् जमविण्याची ही पद्धत कशी काय ...


ह्याचं श्रेय सौदागरांना जातं. त्यानी हा ध्यास ... नाट्यगीत मिळालं की ते मूळ ज्या चीजेवरून घेतलंय ... जमव. फार महत्वाचं काम आहे ते. त्यामुळे संगीताचा ... माझ्याकडे मौजूद आहे. नारायणराव व्यासांचे ध्वनिमुद्रि... लेसन्सही (LESSONS) माझ्याकडे आहेत. सौदागरांनी ... पण कित्येकानी मदत केली. संगमेश्वर गुरव, वि. रा. ... मराठे, पु. ल. देशपांडे, आणि भेटलेली सर्व संगीतप्रेमी ... मोठी सगळी.

• कोणता कालखंड प्रामुख्याने आहे?

१९२४ ते ५० तशा रेकॉर्डस् १९०६ पासून आहेत. ... जोरदार! नाट्यसंगीत, चित्रपटसंगीत (मराठी) आणि सं... होते. ५४ नंतर मी थांबलोय. १९४४ साली मराठी रंगभू... गायक नट, श्री. गंगाधरपंत लोंढे वारले. तो काळ तिथे ... पासून आपण आता पाहतो त्या रंगभूमीला सुरुवात झा...

• कोणाच्या रेकॉर्डस् प्रामुख्याने आहेत?

सर्वांच्याच आहेत. बालगंधर्वांची सव्वाशेच्या आसपास ... बाई सुंदराबाईची ४०-५० गाणी आहेत. पण जेवढे रंगभू... ते सर्वच मी जमविलेत. सवाई गंधर्व, केशवराव भोसले, ... पटवर्धन, मा. दिनानाथ, अब्दुल करीम खाँ, बापूराव पेंढारकर, ... गोरे पागनीस, श्रीपादराव नेवरेकर, मिराशीबुवा असे नाट... असले नसलेले मातब्बर माझ्याकडे आहेतच, केशवराव ... रामभाऊ कृष्णराव, बडोदेकर विठ्ठल साकरकर अशी ... पडद्याआड गेलेली ही काही मंडळी आहेत.



...तून काही महत्वाची गोष्ट लक्षात आलीय?

... नाट्यसंगीताच्या स्वरूपात होणाऱ्या बदलातून, नाटक हे ... नाट्यसंगीतातील स्वरूपांचे भाग पाडता येतील. उदा. ... सुरू केलेलं सुरूवातीचं नाटक, (सौभद्र, शाकुंतल, ...) ह्यांतील नाट्यगीतांचा आधार, शास्त्रीय संगीत ... चालींकडे होता. मूकनायक हे त्या पठडीतल्या संगीताचे ... नंतर आले. मानापमान, ह्यात दादरा, ठुमरी, ख्याल ... स्पष्ट प्रभाव आला. स्वयंवर, विद्याहरण ही त्यातली ... भास्करबुवा बखले, हा त्यातला संगीतकार. प्यारा ... खान यांच्या मूळ दादरा, ठुमरीत गायलेल्या चीजा हा ... गाभा होता. मग आलं संशयकल्लोळ. गोविंदराव ... ह्यातले नाट्यसंगीतातील अग्रणी नाव. ह्यांनी नाट्यसंगीत ... केलं. आशा, निराशा, नंदकुमार, सावित्री, अमृतसिद्धी, ... हे त्या मालिकेतील नाटके. त्यानंतर आले बाई सुंदराबाई ... 'एकच प्याला' हा त्यातला ठळक बिंदू. गझल, ... दादरा यांच्यातील नाजूक नजाकत गाण्यात आली. ... ह्या संगीताचा मुकुटमणी! गाणे, संगीतातल्या काही खास ... जनमानसात आलं. अर्थात त्याला फक्त गाणे जबाबदार ... नाटकाच्या विषयात, मांडणीत काही वैशिष्ट्यपूर्ण फरक ... देवल ह्यांनी नाटक आणि संगीतातील ज्ञानाचा, गतिचा ... करून लिखाण लिहलं, तर 'एकच प्याला' कार गडकरी ... श्रेष्ठ पण गाण्याशी तसा फारसा संबंध नसलेले. मा. ... एकाच वेळी संगीत नाटक आणि सिनेसंगीत ह्या दोन ... संगीत प्रकारात प्रयोग केले. त्याचाही एक अप्रत्यक्ष ... असणारच! एक गोष्ट खूप महत्वाची वाटते ती अशी ... कालखंडात, शास्त्रीय गाणे, त्याखालोखाल नाट्यसंगीत ... संगीत किंवा 'सुगमसंगीत' अशी विभागणी होती आणि ... सर्वांनाच तत्वतः मान्य होती. कुलवधू हे नाटक ... आणि मा. कृष्णराव ह्यांनी संयुक्तपणे संगीतमय केले. ... हे दोघे सुगम गीतांकडे वळले पण नाट्यसंगीतातील ... पद्धत त्यानी तशीच राहू दिली. आताचे सुगमसंगीत ... वाटते किंवा पूर्वीची, जोत्स्ना भोळे, वाटवे, नावडीकर ... ऐकताना नाट्यसंगीताची अपरिहार्य आठवण होते हे कशाचे ...?

... संगीताविषयी काही सांगू शकाल?

... रेकॉर्डस् जमविल्यात १९५० पर्यंत. त्यामुळे त्याविषयी पूर्ण ... नाही. पण प्रभातचा पहिला चित्रपट अयोध्येचा राजा ... परंपरेविषयी काही बोलता येईल. गोविंदराव टेंबे (अयोध्येचा ...) ... सैरंध्री, अग्निकंकण, मायामच्छिंद्र) मा. कृष्णराव (... ज्ञानेश्वर) केशवराव भोळे (अमृत मंथन, कुंकू, तुकाराम), ... (देवयानी), सी. बालाजी (म्हणजे बालाजी चौगुले, ... पहिला पाळणा, भक्त दामाजी) दादासाहेब चांदेकर (ब्रम्हचारी, ... वीर), अण्णासाहेब माईणकर (पायाची दासी, भक्त प्रल्हाद) आणि वसंत देसाई (शकुंतला) ह्या संगीतकारांनी त्या त्या काळातील लोकप्रिय झालेले संगीत दिलंय. आणि त्या सगळ्यांचाच संबंध त्यावेळच्या अभिजात गायकीशी होता. सर्व प्रसिद्ध शास्त्रीय संगीतकार, आणि नाट्य संगीतकार ह्या मंडळींशी संबंध जोडून होते. ह्याचा अजून कोणी अभ्यास केला नाही. पण ह्या संगीताच्या अभ्यासातून सुद्धा खूप नव्या गोष्टी हाताशी लागतील, असे मला वाटते.

● आपल्याकडच्या ध्वनिमुद्रिकांचा इतरांना फायदा होतो?

हो. गाण्याच्या अभ्यासासाठी खूप जण येतात. यशवंत देव, शब्दप्रधान गायकी हे त्यांचं पुस्तक लिहित असताना सतत यायचे, पु. ल. येतात, सौदागर येतात, नवीन गायक, नवीन संगीतकार! जितेंद्र अभिषेकी यांचा ही नाट्यगीते आणि त्याच्या मूळ चीजा ह्यांचा चांगला अभ्यास आहे. वासंती रानडे (आताच्या दीपा कार्लेकर) यानी 'नाट्यसंगीताची वाटचाल' ह्या विषयावर डॉक्टरेट केलीय. त्याना ह्याचा खूप उपयोग झाला. नुसतं गाणं ऐकायला येणाऱ्यांची गणतीच नाही. अजमद हुसेन, गप्पा मारायला ऑफिसमध्ये येतात. आम्ही, म्हणजे मी, श्री शेरीकर, वाळकेश्वरचे श्री. रामचंद्र पागे (त्यांनीही माझ्या प्रमाणे रेकॉर्डस् जमवायला सुरवात केलीय) असे तिघे मिळून रेकॉर्डस् ऐकवण्याचा कार्यक्रम करतो. ५/५ तास लोक गाणी ऐकत थांबतात. लोकांनी जुनं गाणं मनात इतकं रूजवून ठेवलंय की ते पाहताना आम्हीही थक्क होतो. आमचा एक फायदा असा होतो की, ह्या निमित्ताने आम्हाला ह्या रेकॉर्डस् ऐकता येतात. त्या स्वर्गीय सुरांच्या, त्या वेळच्या आठवणींच्या डोहात खूप वेळ डुंबत राहता येतं.

●ह्या रेकॉर्डस्मधील तुम्हाला भावणारा भाग कोणता?

नंबर एक, यातलं संगीत. ह्या नादब्रह्मात मी सारं विसरतो. नंबर दोन, ह्या रेकॉर्डशी जुडलेल्या अनेक आठवणी. एकदा सौदागर आले होते. रेकॉर्ड जमीनीवर होती. म्हणून त्यांनी सांगितलं, "दातार, लहान मूल जसं आईला जपतं तसं आपण रेकॉर्डला जपलं पाहिजे." वसंत देसाईना एकदा त्यांचा गाण्याविषयी विचारलं, "एवढी गोड चाल मिळते तरी कशी तुम्हाला!" देसाई हसत म्हणाले, "चाल गाण्यातच असते, तुम्हाला फक्त शोधून काढावी लागते!" सौभद्रच्या गाण्याबरोबर त्याच्या संवादाची ही रेकॉर्ड माझ्याकडे आहे. एकच गाणे वेगवेगळ्या गायक नटांनी गायलेले माझ्याकडे आहे. बालगंधर्वाच्या पूर्वीच्या गाण्यावर गोहरजानचा प्रभाव स्पष्ट दिसायचा. बाई सुंदराबाई आणि मा. कृष्णराव ह्यांच्या चाली गाऊ लागल्यानंतर त्यांच्या गाण्यात शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत ह्यांच अवीट गोड वाटणारं मिश्रण झालं.

सौभद्र मधील संवाद रेकॉर्ड करताना, गंगाधरपंत लोढ्यांना बसून बोलता येईना, तेव्हा बेका कंपनीच्या जर्मन ऑफिसरने त्याना स्टुडिओत उभे राहून, भाषण म्हणायला लावले आणि त्यासाठी म्हणे माईक वर टांगले. दुर्गाबाई खोटे, हिराबाई बडोदेकर आणि लोंढ्यांची आवाजातली ही रेकॉर्ड माझ्याकडे आहे. बालगंधर्वांची काही गाणी, सहीसही उचलून गोहरजान (कर्नाटक) कानडी भाषेत तिची रेकॉर्ड काढी. तशाही काही रेकॉर्डस् माझ्याकडे आहेत. गजानन राव जोशी यांचं व्हायोलिन वादन नव्हे. कंठगायन माझ्याकडे आहे.



खूप रेकॉर्डस्, खूप आठवणी.

आमच्या रेकॉर्डस् ऐकवण्याच्या कार्यक्रमात मी हे सारं सांगतो. आता मी ह्याचा अभ्यासक नसल्यामुळे सांगताना काही चूक होते. कधी उलटसुलट होते. पण मी ते अगोदरच स्पष्ट करतो. मुंबई दूरदर्शनवर माझी झालेली मुलाखत अशीच आहे. ती टेप झालीय. पण त्यांनी ती टेप जपून ठेवलीय...

प्रभाकर दातार खूप बोलत राहतात. अधूनमधून गाणी ऐकवतात. काही गाणी कशी होती हे सांगताना मध्येमध्ये गातातही जसं जमेल तसं. ते ज्या पद्धतीने सांगतात त्यातून सगळं समजतं, ह्या गाण्यांशी, ह्या रेकॉर्डस्शी त्यांनी स्वतःला किती जोडून घेतलंय, हे समजतं. बोलताना त्यांचे डोळे लहान मुलासारखे चमकतात. रस्त्यात एखादं नाणं मिळाल्यावर व्हावा तसा आनंद त्यांना एखाद्या गाण्याचं वैशिष्ठ्य सांगताना होतो.,

हिशोब केला तर ५००० रेकॉर्डस्च्या पाच हजार आठवणी त्यांच्याकडे आहेत. आणि त्यांचा आनंद घ्यायचा म्हणजे रोज एकदोन तरी आठवणी संपायला हव्यात. दातारांना ती काळजी नाही. हयात भर त्यानी गाणं ऐकलंय, अताही ते ऐकतायेत. ब्लडप्रेशरच्या त्रासामुळे ते फार फिरत नाहीत, रात्रीचे कार्यक्रमही करत नाहीत. पण गाण्यांचं मनन अहोरात्र चालू असत. संध्याकाळी घराचा जिना चढताना ते मनातल्या मनात कुठलीतरी आठवण गुणगुणत असावेत.

त्याना भेटायला गेलो तेव्हा ते घरीच निघाले होते. घराच्या अरूंद जिन्यावरच त्यांची गाठ पडली. क्षणभर वाटले, ५००० तबकड्यांच्या साक्षीने १९८७ सालंच प्रभाकर दातार नावाची रसिकता गुणगुणत राहिलं आहे. ●





निवेदन :
मधुकर नेराळे

लावणीचा उदयास्त

शब्दांकन :
पंढरीनाथ



पठ्ठे बापूरावांची
सारंगधरा' ही
सादर करताना
कोल्हापूरकर. या
जुन्याही नव्हेत
आधुनिक पिढीच्या
परंतु जुन्या पिढीचा
त्यांच्या सादरीकर
पूर्णांशाने आढळ

लावणी या साहित्य प्रकाराचा उदय नेमका केव्हा झाला हा संशोधनाचा विषय आहे. परंतु शिवाजी महाराजांच्या काळात लावणी आढळत नाही. थोरल्या बाजीरावाच्याही काळात आढळत नाही. ती पेशवाईच्या उत्तर काळात विकसित झालेली दिसते. तिला दरबारी दर्जा मिळालेला दिसतो. तिचा नेमका उगम, साहित्यातील स्थान वगैरे गोष्टी संशोधकांसाठी सोडून आपण तिच्या लौकिक स्वरूपाकडे वळू या.

...घाटी, पंढरपुरी, चौकाची व छक्कड असे चार प्रकार रुढ ...लित असलेली लावणी ही या मूळ प्रकारांपैकी नाही. यापैकीः–

बालेघाटी

...सातपुड्याकडील टोकापासून तो गोकर्ण महाबळेश्वरापर्यंतच्या ... परिसरात जे शाहीर झाले त्यांनी लिहिलेल्या लावणीला ... म्हणतात. हीच मूळ लावणी. किल्ल्यात जसा ... तशी लावणीत बालेघाटी लावणी. यांना पुस्तकी 'कसोट्या ... नाहीत. शास्त्रशुद्ध बैठक नाही. तत्कालीन लोकस्थिती व ... ही लावणी सांगते. ती वाङ्‌मयातील रसांचा आविष्कार

पंढरपुरी

पंढरपूर व त्याला लागून असलेल्या मराठवाड्याचा भाग यांमध्ये जे लिंगायत कवी झाले त्यांनी रसात्मक लावणी केली. पण तिच्यात अध्यात्म हा स्थायीभाव होता. यातून भक्तिरसाच्या आविष्कारातून पंढरपुरी लावणी — भक्तीचीं लावणी जन्मली. पंढरपूरच्या उत्पात मंडळींनी तिला शास्त्रीय संगीताची जोड देऊन ती अद्याप टिकवली असे म्हणावे लागते. यात समाज प्रबोधनाचा भाग होता. शाहीर परशुराम देखील श्री विठ्ठलाच्या दृष्टांतामुळे समाज प्रबोधनात्मक लावणी करते झाले. भक्तीची लावणी जास्त करून लिंगायत शाहिरांनी रचली.

... नृत्याचे शिक्षण घेऊन संगीत लावणीला आधुनिक ... पिढीच्या एक प्रतिनिधि लक्ष्मीबाई कोल्हापूरकर ... करताना, सोबत पांडुरंग घोटकर.

शास्त्रीय संगीताच्या अंगाने दरबारी लावणी गाजवणाऱ्या बकुळाबाई इसलामपूरकर यांचे ऐन उमेदीतले छायाचित्र. आज त्यांचे वय ७५ हून अधिक असून अत्यंत वाईटपरिस्थितीतलोकांच्या घरची भांडीकुंडी करून दिवस कंठतात.





बैठकीत
सादर
पिढीतील
कलावती
यांचे गाणे
गाणारी
होऊन
लावण्य
साथ
कोल्हापूर

चौकाची लावणी

हिला थोडी तालसंगीताची बैठक आहे. दरबारी थाटाच्या या लावणीवर उत्तरेकडच्या ठुमऱ्यांची छाप आहे. प्रारंभी मुखडा, मग वाद्याकार लयींचा खेळ खेळतात. यानंतर अंतरा, त्यात चौक पुरा होतो. त्यानंतर अस्ताई, पुन्हा लयींचा खेळ, असे प्रत्येक चौकाचे स्वरूप असते. चौक ८ ते १० ओळींचा. प्रत्येक चौकात एक हकिकत अगर एक भावनाविष्कार. यांना दीपचंदी, अद्धा, धुमाळी, झपताल यांसारख्या तालांची जोड असते. आणि याच्या गायनात अधून मधून येणारी सुस्ती घालवण्यासाठी ही तालांची जोड असते.

छक्कड

हा प्रकार दोन तीनच अंतऱ्यांचा पण उथळ लयींचा. चौकाच्या लावणीचा ओघ कमी होऊ नये हा यातला हेतू. हिची प्रवृत्ती चंचल आहे. गाणे, चाल, वाद्ये या तीन्हीत उतरते.

लावणीच्या सादरीकरणाचे प्रकार दोनः संगीत बा... तमाशाः मुळात तमाशा हा 'गंमत' आहे. तमाशाला ... कधी व कसे पडले सांगता येत नाही. ते मोगली ... असावे. एरवी त्याला विदर्भात खडी गंमत, खानदेशात ... पश्चिम महाराष्ट्रात वायदेशी अथवा माणदेशी गंमत, ... गंमत म्हणत. यात नाचणाऱ्या बायांचा प्रवेश फार ... बापुरावांच्या पवळाचाही उल्लेख १९१५ ते २० च्या ... पुरुष नाच्या असे. अद्याप कोकणात नाच्या पोऱ्याच ...

संगीत लावणी

हा दरबारी प्रकार. चार भिंतींच्या आत सादर केला ... वळण बुद्धीजीवी लोकांच्या मनोरंजनाचे असते.

आजची संगीत बारी साधारण अशी असते.





...ची लावणी:

... लावणी उत्स्फूर्त व जेथच्या तेथे केलेली असते. फडातच ... शीघ्र काव्य असते. हा आम जनतेचा प्रकार आहे. शेतकरी ... होता. जत्रांमधून त्याचा राबता असे. जत्रेला आलेल्या साऱ्या ... फिरून पहाटे परत येईपर्यंतची व्यवस्था करण्याची गावात ... उजाडेपर्यंत लोकांना खिळवून ठेवण्यासाठी तमाशाचे फड ... अेकच विषय पुरणे शक्य नसे. त्यामुळे तेथल्या तेथे शीघ्र ... म्हणण्याची गरज पडत असे. लावण्यांचा जन्म अशा फडांमध्ये ... त्या संगीत बारीत जात.

... लावण्या सादर करणाऱ्या बाया संगीत बारीतच आढळतात. ... काव्य, गायन व अभिनय यांचे संयुक्त प्रदर्शन याच प्रकारात ... या प्रकारावर मोगली आक्रमणाचा ठसा आहे. मोगलांचा पहिला ... खानदेशात पडत. असे. त्यांच्याबरोबर कलावंतिणीचे ताफे असत. ... दिमतीला स्थानिक नोकर चाकर देत असत. ते भटक्या ... जमातींचे असत. हे नोकर काही कला आत्मसात करीत ... उठून गेल्या की, गावोगाव फिरून ही अर्जित कला सादर करीत.

... जानकी भिल्लीण खानदेशात प्रसिद्ध होती. तिनेच या उत्तर ... पेशकरीवर मराठी साज चढवून नवा साचा तयार केला. ... पुढे प्रसार झाला. संगीत लावणीचा हा उगम असावा. मोगल ... खाली उतरत गेले तेव्हा हा प्रकार कोल्हाट्यांनी आत्मसात केला. ... तमाशात संगीत बारीत कोल्हाटी जमातीचे वर्चस्व आढळते.

...तील फार जुन्या नावांचा छडा लागत नाही. परंतु गेल्या ... वर्षातील काही नावांचा अुल्लेख करणे शक्य आहे.

संगीतबारीची परंपरागत वाद्ये तुणतुणे व मातीचा तबला इतकीच असत. त्यात हार्मोनियम प्रथम आणण्याचा मान कासू वारू अनुसया कवठेकर यांची आई बहिणाबाई कवठेकर हिच्याकडे जातो. याखेरीज काही गाजलेली नावे अशी.

काही गाजलेल्या बाया :

यमुना (हिरा तारा) वाईकरीण, मथूबाई इंदुरीकरीण, कीसाबाओी तासगावकर, किसाबाई खडकीकर, कौसल्याबाई कोपरगावकर, अनुसयाबाई जेजुरीकर, गोदावरी बाई पुणेकर (या मुळच्या गोव्याच्या जयकर) लैला चांगुणा जेजुरीकर (ही लीला गांधीची आई, मूळ नाव सावित्री. पण अत्यंत देखणी. तिचा लैला मजनूचा खेळ नामांकित होता. लोकांनीच तिला लैला हे नाव दिले.) शेवतांबाई 'बिजली' जेजुरीकर, द्वारका रंगू सातारकर, काळी अनुसया वाईकर, गंधर्वतारा (ही फडात बालगंधर्वांची गायकी सादर करीत असे.) शांता वाईकर, कमला वाईकर, पारू



...जुन्या पिढीच्या वयोवृद्ध लावणी कलावंत सत्यभामाबाई पंढरपूरकर ...भिनयप्रधान लावणी सादर करताना. मागे तबल्यावर पांडुरंग ...कर, ढोलकीवर हात ठेवलेले मधुकर नेराळे. सत्यभामा ...च्या साऱ्या लावण्या १५०-२०० वर्षांपूर्वीच्या आहेत. ... नाटक ॲकेडमी पुरस्कार मिळवणारी तमाशातली पहिली स्त्री.

जेजुरीकर व तिची आई पुतळाबाई, 'फेपटी' अनुसया लोणंदकर, हिरा 'झेंडेवाली' भोरकर, यशोदा कृष्णा वाईकर, भागीरथी वाईकर (ही कथ्थक नृत्यप्रवीण होती.) छबू शिरवळकर, कौसल्या खेडकर, बकुळा इसलामपूरकर, लालन झरेकर, लीलाकला येवलेकर, बबनबाई पंढरपूरकर, सत्यभामाबाई पंढरपूरकर (या हयात असून वय ७१ असले तरी अदाकारी कल्पनातीत आहे.) ताराबाई लोणंदकर, चंद्राबाई लोणंदकर, गोरी अनसुया लोणंदकर, शाम-सुंदर वाईकर, कमला जयसिंगपूरकर, गौरा माळी, मंजुळा-लक्ष्मी कोल्हापूरकर, जयश्री कोल्हापूरकर, मैना कोल्हापूरकर, नैना-तारा कोल्हापूरकर, बया-प्यारन इसलामपूरकर, हौसा-अनुसया इसलामपूरकर, सरू इस्लामपूरकर, सरू सातारकर, रूम-सुशीला जळगावकर, वनमाला जळगावकर, भिकूबाई चंदनकर, उषा चव्हाणची आई हिराबाई अवसरीकर, हिरा-तारा खडकीकर (तबलजी पंडित विधाते यांच्या भगिनी.) रोशन सातारकर.

अदाकारीतील फरक :

या बाया एकच लावणी वेगळ्या ढंगाने सादर लोकप्रिय करीत. उदा. 'कुठवर पाहू वाट तुझीरं' ही लावणी सत्यभामाबाई पंढरपूरकर यांनी सादर केली तर ती पूर्णपणे अभिनयप्रधान असते. यमुनाबाई वाईकर ती शास्त्रीय संगीताच्या अंगाने सादर करतात. मथूबाई इंदुरीकरांचा बाज तर अस्सल हिंदुस्तानी रागसंगीताचा होता.

या जुन्या कलावंतींचा ग्वाल्हेर बडोदे, देवास, नागपूर, इंदौर वगैरे मराठी संस्थानांमध्ये दरबारी मान होता. आता संस्थानेही नाहीत व ते कलावंतही नाहीत. याची काही कारणे आहेत. वर [illegible] आहेत त्या पिढीनंतरच्या मंडळींनी लावणीचा गळाच [illegible] मुख्य कारण म्हणजे वस्तादांचा अभाव. पूर्वी ज्या बायांनी [illegible] त्यामधले साजिंदे हे स्वतःच वस्ताद असत. ते शिष्येला [illegible] पूर्ण तयार करीत. त्यांनी जे कलावंत सादर केले ते [illegible] काही उस्ताद तर चालीदेखील बांधून देत. यापैकी काहींची नावे अशी :—


वामनराव, गणपतराव व बबन काळे, भुरेखां, [illegible] नारायण राव घाटनांद्रेकर, गणपतराव खेडगकर, गंगाराम [illegible] सुखदेवबुवा जेजुरीकर (तबला नवाज), इब्राहीम बोरकर, [illegible] गुरू आणि मालक संगीत नट प्रभाकर पटवर्धन, कोल्हा[illegible] निगवेकर, तबलानवाज अब्दुल करीम खां, लाला पाठारे [illegible] फडातील नर्तकींना सर्वांगाने तयार करीत. महाराष्ट्राला 'सोलो' [illegible] परंपरा नव्हती. सांघिक नृत्यांची परंपरा होती. लावणी नृत्याच्या [illegible] 'सोलो' परंपरा निर्माण करण्याचे श्रेय या वस्तादांचे होय.

नवी लावणी :

१९५५ सालच्या दरम्यान लावणीमध्ये एक मोठे परिवर्तन [illegible] या काळातली पिढी कथ्थक नृत्याचे शिक्षण घेऊन तयार [illegible] नृत्याला पोषक लावण्या लिहिल्या गेल्या. यात लीला गांधी [illegible] पहिला. तिचे शिक्षक गोविंदराव निकम हे या परिवर्तनाचे [illegible] याखेरीज लक्ष्मी कोल्हापूरकर, सुशीला कुसूम उषा अवसरीकर [illegible]

मधुकर नेराळे

मुंबईतील तमाशाचे एकमेव उरलेले आधारस्थान लालबागचे हनुमान थिएटर. त्याचे हे मालक. परंतु त्यांचे काम इथेच थांबत नाही. मराठी तमाशा कला-कलावंत मंडळांचे ते संस्थापक-कार्याध्यक्ष आहेत. तमाशा कला व कलावंत यांच्या अडचणी दूर करून त्यांना स्थैर्य आणण्यासाठी ही संघटना झटते. मधुकर नेराळे यांचे तमाशाविषयक संशोधनही सतत चालू असते. महाराष्ट्रातील लोककला, वाद्ये, कलावंत यांची तालुकावार सूची करण्याचे त्यांचे काम जोरात चालू असून सांगली तालुक्याची सूची त्यांनी छापून तयारही केली आहे.



कर, लता वाईकर, लता लंका नांदुरेकर यांनीही कथ्थक लावणी प्रचलित करण्यात मोठा हातभार लावला. यातूनच दिसते ती नृत्यप्रधान लावणी आली व तिने तमाशाचा केला.

पिढी :

उस्तादच नाहीत. सारे साजिंदे आहेत. त्यांनी विद्या कमावलेली नसण्याने कलावतींना शिक्षण नाही. नव्या रचना मिळत नाहीत. पुन्हा बायांमध्येही अगत्य नाही. श्रम करण्यासाठी लागणारी निष्ठा नाही. बाजारातून आयती रेकॉर्ड आणायची, नाच बसवायचा. प्रेक्षकही कलेच्या अपेक्षेने पहाणारा न राहिल्याने बायांना मेहनतीचे अगत्य राहिलेले नाही. उत्तानपणाच बघायला लोक येतात तर मेहनत करायची कशाला? लोक जर बायांसाठीच येतात तर साजिंद्यांनी तरी कशाला मेहनत करायची? सगळीच उदासीनता झाली आहे.

आज ते कला जगवण्यासाठी, कलेसाठी जगत नाहीत. स्वतःच्या जगवण्यासाठी तमाशा हे नाव वापरतात.




काशी नरेश व त्यांचे चिरंजीव यांनी लालबागच्या हनुमान थिएटरला भेट देऊन लावणीतील स्थित्यंतरांचे अवलोकन केले. त्यावेळचे छायाचित्र. सोबत मधुकर नेराळे, संस्कृतज्ञ कवीश्वर व विद्याधर गोखले.



गीतरचना ही साधनाच !

आपली संस्कृती, कुटूंब संस्था, सामाजिक, सांस्कृतिक अस्मिता आणि आपलं मराठीपण जपणारं, जोपासणारं गीत-संगीत हेच श्रेष्ठ! सामान्यातील सामान्य माणसाला उमजेल, त्याच्या काळजाचा ठाव घेईल तेच संगीत मी खरं आणि श्रेष्ठ मानतो.

□— विजय घोरपडे.



पी. सावळाराम मुळचे कोल्हापूरच्या वाळवा तालुक्यातील. वाळवा तालुक्यातील निपाणी गावी त्यांचा जन्म झाला. बालपण तासगावला गेलं. त्यावेळच्या आठवणी सांगताना ते म्हणतात, 'तासगावला असताना आम्हाला बाळगोपाळांना घेऊन वि. स. पागे गप्पागोष्टी करायचे. विविध प्रेरणादायी कथा-कादंबऱ्या वाचून दाखवायचे त्या काळातील लक्षात राहिली ती कादंबरी म्हणजे आपट्यांची 'उषःकाल'! त्यालाही एक खास कारण. त्यात सावळा नावाचं पात्र आहे. कसे कोण जाणे, पण पागे यांनी ते नाव मला दिलं आणि निवृत्ती रावजी पाटील याचं नामाभिधान झालं पी. सावळाराम! समवयीन मुलं मला 'सावळा-सावळा' म्हणून चिडवायची. पण भविष्य काळात मी याच नावाने नावारूपास येईन, प्रसिद्ध होईन असं त्याकाळी मात्र कोणालाही वाटलं नाही.

'पुढे कोल्हापुरात कॉलेजला आलो. तत्पूर्वीच मला कविता करायचा मोह व्हायचा. कधी-मधी कागद पेन घेऊन चक्क कविता लिहूनही काढायचो! पण ती कोणाला दाखवायचा धीर होत नसे. कॉलेजात आलो आणि माझा धीर बराचसा चेपला. कॉलेजच्या मोकळ्या आणि काहीशा स्वच्छंदी वातावरणात मीही बराचसा सैल झालो. त्यातही गुरुवर्य माधवराव ज्युलियन यांचा सहवास, प्रेरणा आणि उत्तेजन यामुळे मी भारावून गेलो. कविता करण्याचा उत्साह वाढला. कविता करून ती दोस्तांना वाचून दाखवायचा उमदेपणाही वाढला. तशात मी आमच्या कॉलेजातील एका ख्रिश्चन मुलीला उद्देशून एक कविता केली 'काळा गुलाब'! ही मुलगी रंगाने काळी पण अत्यंत मोहक होती. शिवाय नवोदित लेखिका साहित्यिक होती. 'काळा गुलाब' आणि त्याची प्रेरणा कोणाला सांगावी लागली नाही. सर्वांनाच ती माहिती होती. त्यामुळे या माझ्या 'काळ्या गुलाबाचं' अमाप कौतुक झालं. आपणही चांगली कविता करू शकतो याचा एक प्रकारचा आत्मविश्वास मला या कवितेने दिला. मी सपाटून कविता करू लागलो. यातील बहुसंख्य कविता अर्थातच प्रेम कविताच होत्या. या कवितांना प्रसिद्धीही मिळायची. पण मर्यादित!

'परंतु नाना पाटलांचे पत्री सरकार आले आणि आमच्
अक्षरशः नांगरच फिरला. पांडू मास्तर नामक आमचे नात्
गृहस्थ ह्या क्रांतीकारी सरकारात होते. त्यामुळे ब्रिटिश सरका
मागे अगदी हात धुवून लागले. १९४४ मधे मी मुंबईल
ठाण्यात सासऱ्यांच्या ओळखीचे खापरे नावाचे गृहस्थ होते
जागेत बिऱ्हाड थाटलं. रेशनिंग इन्स्पेक्टर म्हणून नोकरीला
दिवस जात होते. स्वातंत्र्य जवळ येत होते. आणि १९४
आपलं एक महान स्वप्न पूर्ण झालं. भारत स्वतंत्र झाला
सरकारच्या जाचातून आमचीही मुक्तता झाली. आणि खऱ्या
माझ्या मनावरचे दडपण साफ साफ निवळले.

'दरम्यान संगीतकार वसंत प्रभू यांचे आणि माझे सूत
एकमेकांच्या सहाय्याने आम्ही माझ्या **'राघू बोले मैनेच्या**
या गीताचे ध्वनिमुद्रित रूपांतर केले. या ध्वनिमुद्रिकेला फार
प्रतिसाद मिळाला. यानंतर माझ्या भावगीतांच्या विश्वाला खरी
झाली. तशात आमच्या या ग्रुपमध्ये लताबाई आल्या आणि
साखर पडावी तसं झालं.

'१९४९ मध्ये लताबाईंनी माझी **'गंगा जमुना डोळ्यात**
कां?", "आई बाप हे दैवत माझे असता माझ्या घरी
जाऊ मी पंढरपुरी!" ही दोन गाणी गायली. लताबाईंची ही
गाणी. पण ती वाऱ्यासारखी संपली. संपूर्ण महाराष्ट्रात या
आणि त्यांच्या ध्वनिमुद्रिकेच्या विक्रीने एक नवाच विक्रम केला

'इथूनच माझ्या गीत-संगीत संसारास जोमाने सुरवात झाली.



१९५० मध्ये चित्रपट विश्वात प्रवेश झाला. माझा पहिला चित्रपट 'रामराम पाहुणे' त्यातील **'शपथ दुधाची या आईच्या फिर माघारी जारी'** ह्या गीताला अफाट लोकप्रियता मिळाली. या नंतर जवळजवळ पन्नास-पंच्याहत्तर चित्रपटांसाठी मी गाणी लिहिली. त्यातील अनेक गाणी लोकप्रिय झाली. आजही ही गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. ग्यानबा तुकाराम, सलामी, बाळ माझं नवसाचं, पुत्र व्हावा ऐसा आदी अनेक चित्रपटांना मी गाणी दिली. इतकंच नव्हे तर 'नांदायला जाते' या चित्रपटाची मी स्वतः निर्मिती देखील केली.''

● चित्रपटांसाठी गीते तयार करताना काही वेगळेपणा पाळगावा लागतो का?

चित्रपटातील संगीताला शब्द, नाद माधुर्य याची लय सांभाळावी लागते. नाट्य गीतांमध्ये पुष्कळदा आधी चाल बांधली जाते. आणि त्यानंतर शब्दांचे जोडकाम केले जाते. परंतु चित्रपटातील गीतांबाबत असे नसते. आधी गीत तयार करावे लागते. मग त्याचा भावार्थ लक्षात घेऊन त्याला साजेल अशी प्रसंगाला उचित अशी चाल बांधली जाते. मात्र गीत लिहिण्यापूर्वी मी अनेक प्रकारची खबरदारी घेतो. प्रथम म्हणजे चित्रपटात हे गाणं कधी आहे, कुठे आहे आणि कोण म्हणतय् याचा मी बारकाईने, भावुकतेने विचार करतो. आणि चक्र परकायाप्रवेश करून मी ते गाणं लिहित असे.

● इथला परकाया प्रवेश लौकीकार्थानं असेल. तो कसा साधायचा? त्याची आवश्यकता आहे का?

परकाया प्रवेश म्हणजे ज्या व्यक्तीच्या तोंडी ते गाणं जाणार आहे त्या कायेत प्रवेश. समजा गाणारा एखादा गाडीवान आहे तर ते गाणं त्याच्या ढंगात शैलीत उतरलं पाहिजे. तरच ते अस्सल ठरेल. आणि हा अस्सलपणा, अभिजातपणा आणायचा तर परकाया प्रवेश केल्याशिवाय तो कसा येईल.

● चित्रपट गीते लिहिताना आणखी काय काय खबरदारी घ्यावी लागते?


एकदा गाणारी व्यक्ती समजली की तिचे शब्द, उच्चार हे चपखलपणे त्या व्यक्तीच्या तोंडी बसतील अशीच शब्दरचना मी करतो. तसेच वेळ हा घटकही महत्वाचा आहे. त्यानुसार गाण्याचा तोल आणि ताल सांभाळणे आवश्यक असते आणि गाणाऱ्या व्यक्तीला अभिनय किती आहे याचाही अंदाज घ्यावा लागतो. गाण्याचे चित्रिकरण करताना दिग्दर्शकाला कोणता परिसर अपेक्षित आहे याचाही ते लिहितांना विचार करावा लागतो. उदाहणार्थ **''जेथे सागरा धरणी मिळते तेथे तुझी-मी वाट पहाते''** या सुप्रसिद्ध गाण्याची रचना करण्यापूर्वी मी दिग्दर्शकाला चित्रीकरणाचे संभाव्य स्थळ विचारलं आणि मी ही ओघवती 'अक्षर' रचना केली. एकूण वेळ, ताल, राग अभिनय, सिच्युएशन आदी सर्व बाबींचा विचार करून त्याचा समन्वय साधावा लागतो. दुसरे उदाहरण म्हणजे एक गीत रानात घ्यायचय् असे म्हणंताच मी रचना केली **''कोकीळ कुहू कुहू बोले!''**

● गीत आणि संगीत यात तुमच्या मते महत्वाचे स्थान कोणाकडे?

खरं तर दोन्हीही महत्वाची आहेत. निव्वळ संगीत चांगलं असून भागत नाही तर गीतातील शब्द, त्याचा भावार्थ हाही तितकाच महत्वाचा असतो. गीतातील शब्दांमध्ये जीव असावा लागतो. असा जीव जो पटकन काळजात भिडेल! गीताचे संगीत, चाल हे उत्तम असून अनेक गीते तात्कालिक ठरली आहेत. अगदी नाट्य-पदांचे उदाहरण घ्या! पट्टीच्या गाण्याऱ्यांच्या तोंडीच काही गाणी शोभतात, सुश्राव्य होतात. अन्यथा त्यांना काहीच भवितव्य नसते. म्हणनू गीताची शब्दरचना, चाल, ताल आणि संगीत या सर्वच गोष्टी जोरदार असाव्या लागतात.

● तुमच्या लोकप्रिय गाण्यांचं गमक कोणतं?

सरळसोपी भाषा! माझे वडिल वारकरी सांप्रदायाचे होते. त्यामुळे मला संत आणि संत वाङमय याविषयी विशेष प्रेम आहे. त्यातूनच त्याचा मी अभ्यासही केला. आणि मला त्यांच्या सरळ साध्या, सोप्या भाषेने भारावून टाकले. या संपूर्ण सहित्याची निर्मितीच मुळी जनसामान्यांसाठी करण्यात आली होती. ज्ञानरायांचे बंड ही ह्याचसाठी होते. वेद-पुराणे ही त्यांनी जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची कामगिरी स्वीकारली आणि यशस्वीही केली. अशिक्षित वारकरीही तुकारामाचे अभंग तालासुरात गात बेभानपणे नाचतो हे आपण पाहतो. याचं कारण त्यांची सोपी ओघवती भाषा! माझ्या गाण्यांसाठी मी हीच भाषा आदर्श मानली. म्हणूनच मी **''आली हासत पहिली रात, उजळत प्राणांची**



फुलवात'' अशी शब्दरचना सहजतेने करतो. अणि तितक्याच सहजतेने ती खेड्यापाड्यात-झोपडपट्टीत पोहोचते. बौद्धिक कस, तर्काहून भावनिक रस आणि काव्य याचा समन्वय साधून मी सोपी सुटसुटीत रचना करतो. ''**नयनात हास्य तरळले**'' असं म्हणण्यापेक्षा मी चक्क ''**डोळे हसले**'' असं म्हणणं अधिक पसंत करीन आणि रसिकांनाही ते अधिक भावते हे स्पष्टच आहे. मराठी माणसाला गाणं कळावं लागतं. आणि त्यासाठी ते त्यांच्या भाषेत, समेतच लिहावं लागते तरच ते लोकप्रियता प्राप्त करू शकते. मी ही कसोटी कधीच सोडली नाही. म्हणूनच माझी गाणी सर्वाधिक लोकप्रिय होऊ शकली. उगाचच बौद्धिक कसरत, तार्किकता करीत मी कधीच गाणी लिहिली नाहीत.

● तुमची गाणी किती संगीतकारांनी संगीतबद्ध केली?

जवळजवळ आघाडीच्या सर्वच संगीतकारांनी माझी गाणी संगीतबद्ध केली. वसंत प्रभू, सी. रामचंद्र, राम कदम, वसंत देसाई, विश्वनाथ मोरे, सुधीर फडके, दत्ता डावजेकर, यशवंत देव आदींची नावे सांगता येतील.

● या संगीतकारांपैकी तुम्हाला अधिक श्रेष्ठ असा कोण वाटतो?

हे सर्वच संगीतकार आपापल्या परी श्रेष्ठच म्हणायला हवेत. अर्थात माझी बरीचशी गाणी वसंत प्रभूंनी केली. याचा अर्थ ते मला अधिक उजवे वाटत होते असे नव्हे. पण त्या काळात आमची एक टिम तयार झाली होती. दिनकर पाटील, मी माधव शिंदे आणि प्रभू! खुपसे चित्रपट आम्ही जोडीने केले. अर्थात हे सर्व संगीतकार श्रेष्ठ असले तरी या प्रत्येकाचे काही ना काही वैशिष्ठय होतेच! सी. रामचंद्र मी किंग ऑफ दी ऱ्हिदम मानतो. ऱ्हिदमचे त्यांचे ज्ञान आणि अप्रतिमच होती. माझ गाणं त्यांना फार आवडायचं. कारण अपेक्षित ऱ्हिदम ताल-त्यांना त्यात रेडिमेड मिळायचा. गाण्याचे त्यांना कधी बदलावे लागले नाहीत. शास्त्रोक्त गाण्यांचा आधार मधूर गीत देण्यात् वसंत देसाई यांचा विशेष हातखंडा होता. गाण्यातील सोपेपणा त्यांना अत्यंत मोहक आणि अभिजात भालजी पेंढारकरांनी एकदा देसाईंना विचारले की तुम्हाला कोण हवाय?.... तात्काळ देसाईंनी माझं नाव सुचविलं. वसंत तर हयात भर गाणी सूरबद्ध करताना ऱ्हिदम, ताल, ढंग आणि यांची विशेषत्वाने जोपासना केली. सुधीर फडके लाईट क्लासिकल संगीतकार म्हणूनच ख्यातनाम आहेत. थोडक्यात गीतकार ज्या ज्या संगीतकारांच्या सान्निध्यात आलो, ते ते श्रेष्ठच हवेत. माझी गाणी एवढी लोकप्रिय होण्यात त्यांचा, लताबाईंचा वाटा आहे!

● तुमची बहुसंख्य गाणी लताबाईंनी गायली. त्यांच्याविषयी म्हणजे त्यांच्या गाण्याच्या पद्धतीविषयी काही सांगाल का?

लताबाईंनी माझी सर्वच गाणी गायिली. माझं पहिलं गाणंही गायले. आणि विशेश म्हणजे आम्ही तिघेही, मी, लताबाई संगीतकार वसंत प्रभू नवेच होतो. कोणीही नावारूपाला आलेला परंतु आमची ती पहिली वहिली गाणी म्हणजे जणू त्रिवेणी



...णा प्रचड लोकप्रिय झाली. लताबाईंचं गाण्यांचं वैशिष्ठ्य मी ...ने सांगण्याची गरज नाही. पण त्यांची पद्धत अत्यंत जिज्ञासू ...कित्सक अशी होती व आहे. गाण्यांतील शब्द न शब्द त्या प्रथम ...न घेत. अमुकच शब्द कां? अणि तोच शब्द लिहिताना माझ्या ...वना काय होत्या? लिहिताना काय अनुभूती आदी अनेक चिकित्सक ... करून लताबाई त्या गीताशी, त्यातील शब्दाशी भावनिक तादात्म ...यायच्या आणि मगच गायच्या. त्यांचा हा एक प्रकारचा परकाया ...शच असायचा. म्हणूनच त्यात गात तेंव्हा शब्द, त्यामागील भावना ...वंत व्हायची आणि ती भेट रसिकांच्या हृदयाशी जाऊन भिडायची!

• तुमची ही साधना कधी थांबली?

थांबली असं म्हणता येणार नाही. परंतु पूर्वीचा वेग मात्र मंदावला ...ढं खरं! १९६९ मध्ये वसंत प्रभु निवर्तले. हे एक आणि दुसरं ...जे आमचं वय! आता वयोमानाने पूर्वीसारखा उरक राहिला नाही. ...- प्रसिद्धी सर्व काही मिळालं. त्यासाठी काही करावं अशी इर्षा ...ता राहिली नाही. मध्ये "चटक-चांदणी" साठी गाणी लिहिण्याची ...फर आली होती पण ती मी नाकारली. अलिकडे काय आणि पूर्वी काय? मनापासून वाटल्याशिवाय मी कधी काही रचना केली नाही. नाही तर "पापड, लोणच्यांवर कविता करायची ऑफर मलाही आली असती. निर्मिती मध्ये मनापासून आनंद मिळतो आणि तोच आनंद रसिकही मनमुराद लुटतात, असे गीत-संगीत कधीही मरत नाही. ते 'अक्षर' च ठरते. सध्या लोकाग्रहास्तव माझ्या अशा काही 'अक्षर गाण्यांचा' कार्यक्रम चालू आहे. रसिक आजही त्या गाण्यांचा पूर्वीइतकाच उत्कटतेने आस्वाद घेत आहेत.

• आता शेवटचा प्रश्न! तुमच्या वर प्रेम करणाऱ्या रसिकांबद्दल काय म्हणायचंय?

त्यांचं प्रेम अगाध आहे. अहो! ठाण्याच्या नगराध्यक्षपदासाठी माझी निवड केली ती या रसिकांनीच! निवडणूक म्हटले की उलटसुलट प्रचार आलाच. पण "गंगा जमुना" हे भावपूर्ण गीत लिहिण्याऱ्या भावूक सत्वशील माणसालाच आम्ही निवडून देणार असे या रसिकांनी ठरविले आणि ते साक्षात कृतीत आणले १९६५ साली! मी देखील माझ्या रसिकांना भावना, त्यांच प्रेम अखेर पर्यंत जपल. कुठेही कसलाही भ्रष्टाचार न करता मी माझी त्यांच्या मनातील प्रतिमा कायम ठेवली. ●

संगीतकारांच्या सन्मानार्थ काढलेली टपाल तिकीटे

डॉ. विश्वनाथ कुडके.















संत नामदेव

श्री संत नामदेव महाराजांना वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानण्यात येते. श्री. नामदेव महाराजांच्या जीवनसंदर्भात अनेक अलौकीक घटनांचे उल्लेख केले जातात. १२७० मध्ये त्यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील नरसी बामणी येथे झाला. त्यांच्या पित्याचे नाव दामाशेट व आईचे नाव गोनाई. असं म्हटलं जात की, श्री. नामदेव महाराजांनी आपलं बालपण मात्यापित्यांसमवेत पंढरपूर येथेच घालविलं. जीवनातील प्रारंभिक वर्षीत ते ज्ञानदेवाच्या संपर्कात आले. ज्ञानदेव नंतर कित्येक दशके ते हयात होते.

श्रीसंत नामदेव महाराजांनी धार्मिक दीक्षा विसोवा खेचर यांचेकडून घेतली. ज्ञानदेवांसमवेत त्यांनी उत्तर भारताच्या विविध भागातील तीर्थक्षेत्रांच्या यात्रा केल्या. याच दरम्यान ते पंजाबातही गेले. असंही म्हटलं जातं की नंतरही नामदेव महाराज अेक वर्षासाठी पुन्हा पंजाबात गेले होते. पण आपले बरेचसे आयुष्य त्यांनी अभंग, धार्मिक पदे व भजनं यांचं गायन आणि जनसामान्याच्या भक्तीची ओढ लावण्यात पंढरपुरातच घालविले. १३५० मध्ये त्यांनी समाधी घेतल्याचे मानले जाते.

भारताच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासात कित्येक दृष्टींनी नामदेवाचे स्वतंत्र स्थान आहे. त्यांनी मराठीखेरीज हिंदी भाषेतही अभंगरचना केली. आपल्या संदेशाचा प्रसार केला. पंजाबात बटाल्याजवळ घोमान येथे अेक मंदिर त्यांच्या नावे उभारण्यात आल्याचे दिसून येईल. त्याहीपेक्षा अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांची अनेक पदे व अभंग शीख पंथाच्या धर्मग्रंथ, ग्रंथसाहेबामध्ये समावेष्टीत केली गेली आहेत.

किर्तन परंपरेचे नामदेव महाराज प्रवर्तक असल्याची गोष्ट या आधीच आली आहे. ९ नोव्हेंबर १९७० रोजी नामदेव महाराजांची ७०० वी पुण्यतिथी साजरी केली. त्या निमित्तानं भारतीय टपाल व तार खात्यानं हे तिकिट प्रसिद्ध केले. २० पैसे मूल्यदर्शकांच्या या तिकीटांची फोटोग्रेव्हर मुद्रण प्रक्रीयेनं नारंगी रंगानं छपाई केली होती. ३.९१ × २.९० सें.मी. या तिकीटाचा आकार होता. छापील आकार होता ३.५६ × २.५४ सें.मी. अेकंदर ३० लाख तिकीटे छापण्यात आली होती.

नरसिंह महेता

भक्त, कवी, आणि आर्य संस्कृतीचे अग्रदूत नरसिंह महेता यांनी गुजरातेत अेका नव्या भक्तीची चेतना दिली.

नरसिंह मेहता यांच्या जन्म जूनागढ जवळील तलाजा नामक गावी झाला. त्यांच्या बाल्यावस्थेतच पित्याचा मृत्यू झाला. फक्कड साधुंच्या संगतीत त्यांनी वृंदावन भक्ती संगीत रहस्याचे ज्ञान त्यांना प्राप्त झाले. त्यांच्या ७४० पदांचा संग्रह 'शृंगार माला' या नावानं उपलब्ध आहे. उदात्त भाव आणि उपदेशानं परिपूर्ण असणारी ही पदे प्रेरणा तथा निष्ठेची प्रतीकेच मानावी लागतील. त्यांनी धेड आणि भंग्यासोबतही भजन केले. जिथं भेदभाव आहे तिथं भगवंताचा वास नाही अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांच्या १७ व्या शताब्दीनिमित्त ३० मे १९६७ मध्ये राखी रंगाच्या २० लाख तिकीटांची छपाई करून विक्रीस काढण्यात आली होती. १५ पैसे मूल्ल्यांकनाच्या या तिकीटाचा आकार ३.३४ × २.८८ सें.मी. (छापील आकार २.९९ × २.५२ सें.मी.) अेवढा होता.

विष्णु दिगम्बर पलुस्कर
१८७२—१९३१

पण्डित विष्णु दिगंबर पलुस्कर यांचा जन्म १९८२ मध्ये महाराष्ट्रातील कुरूंदवाड या गावी अेका कीर्तनकाराच्या घरी झाला. अेका दुर्घटनेमुळे त्यांची दृष्टी अधू झाली होती. त्यामुळे शिक्षण पुढे ठेवता येणं शक्य नसल्यानं संगीताच्या आराधनेकडे ते वळले. मिरजच्या राजांच्या प्रेरणेनं त्यांनी स्व. पंडित बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगीताचे शिक्षण घेतले. मिरज येथे १२ वर्ष संगीत अध्ययन केल्यावर त्यांनी देशाच्या चारी दिशेला दूर दूर भ्रमण केले व लाहोर येथेच आपली कर्मभूमी करण्याचे निश्चित केले. येथेच ५ मे १९०१ मध्ये त्यांनी आपल्या गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली.

पलुस्करांच्या काळात संगीताच्या अभ्यासकांना व पंडितांना सन्मानपूर्वक वागविण्याची प्रथा नव्हती. पण विष्णु दिगंबरांनी आपल्या किमयेनं प्रचलित पूर्वग्रह पार बदलून टाकण्यात यश मिळविले. भारतीय संगीतासाठी त्यांनी स्वरलिपीचा विकास केला व गांधर्व महाविद्यालयासाठी मोठ्या संख्येनं पुस्तकं प्रकाशित केली.

लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी अशा राष्ट्रीय नेत्यांच्या निकट संपर्कात विष्णु दिगंबरजी आले व भारतीय संगीताच्या पुनरुज्जीवनात त्यांचा पाठींबा मिळविण्यात ते यशस्वी झाले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात ते उपस्थित राहत असत आणि त्या ठिकाणी श्रोत्यांचे उदबोधन करीत. 'रघुपती राघव राजाराम' या महात्माजींच्या आवडत्या भजनांचा स्वर साज त्यांनीच बांधला होता.

३० पैसे मूल्यांकनाची लाल रंगाची ही तिकीटे ३.९१ × २.९० सें. मी. (छापील ३.५६ × २.५४ सें.मी.) या आकारात १० लाख यां संख्येनं छापण्यात आली होती. २१.७.१९७३ रोजी ती विक्रीसाठी काढण्यात आली होती.

तानसेन

हिंदुस्थानी संगीताच्या इतिहासात केवळ नावापोटी आणि दंत कथांद्वारे जेवढे आकर्षण तानसेनबद्दल आहे तेवढे कोणाबद्दलही नाही. ब्राह्मण कवी मकरंद पांडे आणि त्यांची पत्नी यांना सूफी फकीर, मुहंमद गौस याच्या आशिर्वादानं सत्राव्या शतकाच्या आरंभी या पुत्ररत्नाचा लाभ झाला. लहानपणात तान्सेनाला अनेक हिंदू व मुस्लिम नावानं ओळखलं जात असे. ग्वाल्हेरचे महाराज रामनिरंजन यांनी मिया तानसेन असे नाव दिले. आणि नंतर त्याच नावानं तो ख्यातकीर्त झाला.

तानसेनानं वृंदावन येथील महसान संत आणि संगीतकार हरीदास यांचेकडून संगीताचे शिक्षण घेतले. लवकरच तानसेन निपुण संगीतकार झाला. शीवाचे शासक रामसिंह यांनी त्याला दरबारी संगीतकारपदी नियुक्त केले. तानसेनाची ख्याती सर्वदूर पसरली. पुढे सम्राट अकबरानं त्याला आपल्या दरबारी बोलाबले आणि आपल्या 'नवरत्नांत' सामिल केले.

तानसेनाच्या काळात हिंदुस्थानी संगीत कला परमोत्कर्ष पदावर पोहोचली. त्यांनी अत्यंत सुंदर पण कठीण अशा धृपद रागात निपुणता संपादन करुन ही गायकी लोकप्रिय केली. तानसेनाचे अनुयायी व उत्तराधिकारी केवळ धृपद मायकीतच गात व त्यांना सेनीय घराण्याचे मानले जाते. नाईक बीजू, तुळशीदास, रामदास, मीराबाई, सूरदास तथा अन्य प्रतिभाशाली संगीतकार व कवींशी तानसेनचा संपर्क आला. तानसेन केवळ पहिला आणि अंतिम महान धृपद गायक नव्हता तर तो अेक महान संगीतज्ञ व कुशल संगीतकारही होता. 'हजारो वर्षात तानसेन सारखा संगीतकार झाला नाही. असे अब्दुल फझलने लिहिले. संगीतकार व रागमाला या दोन अत्यंत मौल्यवान कृतींचा रचेता म्हणून ही त्याला मानण्यात येते.

तानसेनचा परिवार व स्वतः सम्राट अकबर त्यांच्या अंतिम समयी त्याच्या मृत्यूशय्येपाशी होते. ग्वाल्हेरपासून दूर बेहट नामक छोट्याशा गाव्ही, जिथं तानसेनाचा जन्म झाला, तिथंच या महान प्रतिभाशाली संगीतकाराचे स्मारक आज साऱ्या संगीतप्रेमीयांचे तीर्थस्थान बनले आहे.

१ रुपयाचे हे बहुरंगी तिकीट ४.०६ × २.७३ सें.मी. (छापील ३.७१ × २.३८ सें.मी.) या आकारात छापण्यात आले होते. १२.१२.८६ रोजी वितरणासाठी काढण्यात आलेल्या या तिकीटाच्या पंधरा लाख प्रती छापण्यात आल्या होत्या.

स्वामी हरिदास

स्वामी हरिदासांचा जन्म सन १४७८ मध्ये, निकुंज प्रवेश (निर्वाण) सन १७७३ मध्ये झाले. स्वामी हरिदास संत कवी तर होतेच पण त्याचबरोबर बैजू बावरा, तानसेन आदी अनेक महान संगीतातज्ञांचे गुरूदेखील होते. शास्त्रीय संगीतातील धृपद आणि धमार शैलींचे ते अग्रदूत म्हणून ही ख्यात आहेत. पुढे त्यांच्या शिष्यगणांनीही त्यांचे अनुसरण केले. स्वामी हरिदास यांच्यापाशीच तानसेनांन या दोन्ही शैल्यांचं शिक्षण घेतलं व त्यांत तो एवढा ख्यातकीर्त झाला की,

प्रत्यक्ष अकबराच्या राजदरबारी नवरत्नांत त्याला उच्च स्थान प्राप्त झालं.

भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून वृंदावन दिव्य वातावरणाचे स्थळ मानले जाते. या दिव्य वातावरणाचे पुनरुज्जीवन या भागात स्वामी जींनी केले. नारद आणि तुंबठ या प्रमाणेच स्वामीजीही भारतीय शास्त्रीय संगीतातील अेक नक्षत्र म्हणता येअील. त्यांच्या चरणतली बसून संगीताच्या दिव्य कलेचे शिक्षण ग्रहण करण्यासाठी येणाऱ्या साधकांचा धर्म कोणता आहे हे न पाहता ते शिक्षण देत.

स्वामी हरिदासांनी धृपद, धमार आणि ठुमरीला ठोस स्वरूप प्रदान केले. संगीताच्या विभिन्न शैल्यांचे मिश्रण करून त्यांना लोकोत्तर रूप स्वामींनी दिले.

अेक रुपया मुल्यांकनाच्या या तिकीटाची छपाई बहुरंगी होती. १९ सप्टेंबर १९८५ मध्ये विवरीत केलेल्या या तिकिटाच्या १५ लाख प्रती छापण्यात आल्या होत्या. आकडा ४.०६ × २.७३ सें.मी. (छापील ३.७१ × २.३८ सें.मी.)

मुत्तुस्वामी दीक्षितर

कर्नाटक संगीत क्षेत्रातील महान संगीतकार मुत्तुस्वामी दिक्षितर यांचा जन्म संजावर जिल्ह्यातील तिरूवारूर नामक गावी १७७५ मध्ये झाला. किशोरावस्थेतच मुत्तुस्वामींनी संस्कृत व अन्य विषयांचा अभ्यास केला व संगीताच्या अभ्यासासाठी आवश्यक त्या पूर्वतयारीसाठी तेलगूचाही अभ्यास केला. पंधराव्या वर्षी त्यांनी संत चिदम्बर नाथ याच्या समवेत वाराणसी येथे प्रयाण केले. येथील पाच वर्षाच्या वास्तव्यात त्यांना हिंदुस्थानी संगीत अैकण्याची संधी मिळाली. हिंदुस्थानी संगीताची छाप त्यांच्या संगीत रचनेत पहायला मिळते.


दक्षिणेत परतल्यावर ते तिरूत्तणी येथे गेले व तेथून भगवान सुब्रमण्यच्या मंदिरात उपासना करू लागले. या मंदिरात ध्यान मग्न असताना कुणा वृद्ध गृहस्थानं येवून त्यांना दृष्टांन्त दिला अशी आख्यायिका आहे. या दृष्टांन्तानं उल्हासीत झालेल्या दीक्षितरांच्या कंठातून संगीताच्या लहरी उमटल्या. 'श्री नाथादी गुरूगृह ही त्यांची पहिली संगीतरचना. यानंतर त्यांच्या संगीत रचनांची मालिकाच सुरू झाली:

१८१७ मध्ये आपल्या पित्याच्या निधनानंतर दिक्षितर शिष्यांना संगीत शिक्षण देण्यासाठी तंजावरात गेले. तेथून अेट्यापुरममध्ये. १८३५ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या एवढी संगीतात विविधता आणणारा दुसरां संगीतकार त्या काळी नव्हता.

१८ मार्च १९७६ रोजी विक्रीत केलेल्या तिकीटाचे मूल्य होते २५ पैसे. नीवसर भुरकट रंगाच्या या तिकीटाचा आकार ३.३४ × २.८८ सें. मी. (छापील २.९८७ × २.५२४ सें.मी.) होता. प्रतसंख्या ३० लाख.


या तिकीटांखेरीज बुरन्दरदास, त्यागराज, पंडित विष्णु नारायण भातखंडे, संत मीराबाई, संत कबीर आदी संगीत सेवा बजावलेल्या मंडळींच्या सन्मानार्थ ही टपाल व तारखात्यानं तिकीटे काढली आहेत. ●








वरची रांग अब्दुल हलीम जाफर खान, लतीफ अहमद, अल्लार खां
दुसरी रांग मोगुबाई कुर्डीकर, शहाफत अहमद, झाकिर हुसेन
तिसरी रांग सुधीर फडके, सुरेश तळवलकर, अमजद अली


[illegible] चर्चा अशक्य

[illegible]चे चरित्र लिहिताना गोविंदराव टेंबे म्हणतात — "खाँसाहेबांची [illegible] अगाध की त्यांच्या गायकीच्या अंतरंगांची चर्चा करणे [illegible]च; पण स्थूलमानाने तिचे स्वरूप निश्चित करणेही [illegible]च्या कुवतीबाहेरचे आहे". रागाची बढत घेऊन तानांची [illegible] करीत खाँसाहेब जेव्हा समेवर येत, तेव्हा श्रोत्यांकडून [illegible] अशी उत्स्फूर्त दाद मिळायची. ध्रुपद धमारावर चीजा [illegible] असायच्या! तेच त्यांच्या गायकीचे अधिष्ठान होते. १९१९ [illegible] क्लबतर्फे राजाराम कॉलेजच्या (जुनी इमारत) हॉलमध्ये [illegible] भरविण्यात आला होता. अल्लादियाखाँसाहेब, बाळकृष्णबुवा [illegible]कर, रहिमतखाँ, बखले बुवा, वझेबुवा, बालगंधर्व, केशवराव [illegible] आदि मातब्बर कलाकारांनी या मैफलीत आपापली कला सादर [illegible] खाँसाहेबांच्या गायकीमुळे तर श्रोते देहभान हरपलेच; पण या [illegible] बैठकीत केशवराव भोसलेनी जो प्रभाव पाडला — गायकीचे [illegible] दाखविले, त्याला कोल्हापुरच्या संगीत मैफलीत अनन्य [illegible] महत्त्व आहे.

[illegible]कली तो नही देखी

[illegible]चा अखेरचा कालखंडच घ्या! १९४४ मध्ये मुंबईत [illegible] परिषद घेण्यात आली. गायक, वादक, नर्तकांचा या [illegible] सहभाग होता. खाँसाहेब तेव्हा नव्वदीच्या घरात होते. रात्री [illegible] घेऊन पहाटे ४ वाजता खाँसाहेब गायला बसले. केसरबाई [illegible] आणि चिरंजीव भुरजीखाँ हे दोघे साथीला होते. तबल्याची [illegible] होते गणपतराव गुरव! खांसाहेबांनी रामकली राग 'गायला [illegible] केली. 'आज राधे तोरे बदनपर शाम मिलन की चोरी' ही [illegible] आणि रामकली रागाची लपेट कानावर येताच श्रोते ब्रम्हानंदात [illegible]. भलेभले जाणकार खांसाहेबांना म्हणाले — 'मियाजी ये [illegible] गाये! ऐसी रामकली तो हमने आजतक नही देखी, ना सुनी!'

[illegible]तले साधूसंत

[illegible] १० व्या वर्षी अभिजात गायकीने श्रोत्यांवर मोहिनी टाकणारा [illegible] ११ व्या वर्षी इंदोरला तुकोजीरावांच्या मुलींना शास्त्रीय संगीताचे [illegible] जाणारा हा भीष्माचार्य अखेरपर्यंत केवळ संगीताचाच साधक राहिला. पैसा, जमीनजुमला यांचा मोह खाँसाहेबांनी कधीच बाळगला नाही. बिदागीची अपेक्षा त्यांनी कधीच केली नाही. राजर्षि शाहू महाराज खाँसाहेबावर अपार प्रेम करायचे. शाहूनी खाँसाहेबांना लिहिले आहे — "तुमचेवर आमचे पुत्रवत प्रेम असल्याने तुम्हास आम्ही जमीन देत आहोत. पुत्रपौत्रानी या जमिनीचा भोग घ्यावा." पण खाँसाहेब कोणत्याच मोहात अडकले नाहीत. ते म्हणाले — "मला तुमची कृपा हवी. जमीन नको."

अंतिम क्षणीही संगीत

संगीताच्या या निस्सिम भक्ताविषयी त्यांचे नातू अजिजुद्दिन खाँ उर्फ बाबा गवई म्हणतात — "खाँसाहेबांना हृदयविकाराचा झटका आला होता. मुंबईत इस्पितळात दाखल केले होते. ऑक्सिजनवर ठेवले होते. त्या परिस्थितीतही खाँ साहेबानी डाव्या तळहातावर उजव्या हाताच्या बोटांचा ठेका धरला होता. ताल आणि लयीत ते हरपले होते. तोच एक ध्यास होता त्यांना. संगीत आणि गायन त्यांच्या हाडीमासी भिनले होते. जशी काही ब्रम्हानंदी टाळी लागली होती."

खाँसाहेब हे संगीततले — अभिजात शास्त्रीय गायनातले साधूसंत होते; खाँसाहेबाना ज्यानी पाहिले ते भाग्यवान; ज्यानी त्यांचे गायक ऐकले ते त्याहून भाग्यवान' असे उद्‌गार जेव्हा ज्येष्ठ हार्मोनियम व तबलावादक केशवराव धर्माधिकारी यांच्या तोंडून बाहेर पडतात, तेव्हा खाँसाहेबाच्या कलानैपुण्याची जाणीव झाल्यावाचून राहात नाही.

परंपरेचे जतन

अल्लादियाखाँसारख्या परिसाचे वास्तव्य जवळजवळ अर्धशतक कोल्हापुरात असल्याने अनेक गायक, वादक नावारूपास आले. त्यांचे कलागुण झळाळून उठले. केसरबाई केरकर यांची जडणघडण झाली ती कोल्हापुरात. त्यांनी अखिल भारतीय कीर्ती मिळविली ती खाँसाहेबांच्या शिकवणुकीने! भास्करबुवा बखलेनी अमाप लोकप्रियता मिळविली ती खाँसाहेबांचा आदर्श समोर ठेवून! या अत्रोली घराण्याच्या वास्तव्याने मोघुबाई कुर्डीकर, लक्ष्मीबाई जाधव, वामनराव सडोलीकर, माल्लीकार्जून मन्सूर, मेनका बाई शिरोडकर, आझमबाई, धोंडुताई कुलकर्णी, सी. बालाजी, मधुकर शिरोडकर, नूतन गंधर्व, आप्पासाहेब देशपांडे आदि अनेक शास्त्रीय संगीतातील हिऱ्याना पैलू पडले. हे हिरे झळाळून

गोविंदराव शालिग्राम

लक्ष्मीबाई जाधव

अब्दुल करीम खाँ

नामवंत कलाकारांचे तीर्थस्थान बनलेली देवल क्लबची इमारत